परस्परं भावयन्तः

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ७७ ❖ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ २४) ❖ मार्च २००९

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.) (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार. नविन वर्षाच्या शुभेच्छा. 'हितगुज'ची आपण आतुरतेने वाट पाहत असाल. या अंकात दिनांक १४ मार्च च्या कै.सुरेशभाऊ स्मृतीदिन कार्यक्रमाविषयी जाहिर निमंत्रण आपणा सर्वांना केले आहे. तेव्हा वेळात वेळ काढून आवर्जून या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.*

*तसेच, मराठे प्रतिष्ठान ९ वे अखिल भारतीय संमेलन दुर्ग गाव, कार्कल तालुका, उडिपी जिल्ह्यात दिनांक १ ते ३ मे, २००९ संपन्न होणार आहे. त्यातही सहभागी होण्याचे आवाहन आणि निमंत्रण या अंकात केले आहे. 'हितगुज'चे सहसंपादक आणि कार्यकारिणीतील सदस्य श्री.सी.गो. खांबेटे हे दुर्ग येथे मराठे परिवाराच्या संमेलनासाठी होणाऱ्या बैठकीला मराठे प्रतिष्ठानचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. तिथल्या कुलबांधवांचा उत्साह जोरात आहे. संमेलनाच्या तैयारीला ते मोठ्या हौशीने लागले आहेत. आपण सर्व मुंबई, पुणे, गोवा, सांगली, सातारा, बडौदे, अहमदाबाद, कोकण, रत्नागीरी, बीड, मीरज, इंदुर, भोपाळ, उज्जैनी इत्यादी सर्व ठिकाणी राहाणाऱ्या कपी-गोत्री मराठे परिवाराने या संमेलनासाठी उपस्थित राहाण्याचे आवाहन दुर्ग येथील संमेलन भरवणाऱ्या सर्व आयोजकांनी आग्रहाने केले आहे. तेव्हा त्यांच्या निमंत्रणाला मान देऊन आपण जास्तीत जास्त मंडळींनी उपस्थित राहून संमेलनात सहभागी झाले पाहिजे. त्यांचाच आदर्श आणि त्यांचे अनुकरण सांगली, सातारा, बडौदे, अहमदाबाद, कोकण, रत्नागीरी, बीड, मीरज, इंदुर, भोपाळ, उज्जैनी येथील मराठे परिवाराने करावे आणि पुढील संमेलन भरविण्याचे ठरवावे. ८वे अखिल भारतीय मराठे परिवार संमेलन गोवा-बिंबल येथे ३० एप्रिल ते १ मे २००५ साली भरले होते. त्याला इतके दिवस लोटले परंतु संमेलन भरविण्याचा प्रस्ताव घेऊन कोणीही पुढे येत नव्हते. आता इतक्या दूरून लांब असले तरी दुर्ग येथे संमेलन भरत आहे ती अभिनंदनीय-कौतुकास्पद आहे. तेव्हा आपणही संमेलनात सहभागी होऊन ते यशस्वी करण्यास त्यांना हातभार लावू.*

*आपली शुभचिंतक*
*डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे*
*(दि.२०-२-२००९)*

### जाहीर निमंत्रण
### कै. श्री. सुरेशभाऊ मराठे स्मृतीदिन
### दि. १४ मार्च २००९ला

शनिवार दि. १४ मार्च २००९ला सायंकाळी ५ वाजता ठाणे येथे लक्ष्मीकेशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, खोपट, ठाणे (पश्चिम) पिन-४००६०२ या ठिकाणी मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक कै. श्री. सुरेशभाऊ मराठे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ व्यंगचित्रकार श्री. विकास सबनीस आणि व्हाया वस्त्रहरणचे लेखक श्री. गंगाराम गवाणकर, मुलाखत भाऊ मराठे यांचा कार्यक्रम सादर होणार आहे. सह्याद्री वाहिनीचा 'हिरकणी' पुरस्कार प्राप्त मराठ्यांची माहेरवाशीण डॉ.सौ.वसुधा आपटे यांचा सत्कारही केला जाईल व विशेष मुलाखतही घेतली जाईल. तरी आपण सर्व मराठे परिवाराने अवश्य अुपस्थित राहून रंगतदार कार्यक्रमाचा आनंद घ्यावा. अल्पोपहार, चहापानाने कार्यक्रमाची सांगता होईल.

### मराठे प्रतिष्ठान
### ९वे अखिल भारतीय मराठे संमेलन, दुर्ग ग्राम, ता.कार्कळ (उडिपी), कर्नाटक - १ ते ३ मे, २००९

सविस्तर वृत्त पृष्ठ ३ वर

❖ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे : ८/१३, सहकार नगर, वडाळा (प), मुंबई-४०००३१ ❖
दूरध्वनी : २४१५०८८९ ● ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
❖ अक्षरजुळणी : सौ.सुप्रिया जयंत रेडकर (लक्ष्मी ग्राफिक्स), दादर ❖

मुंबईतुन रेल्वेने नेणारी राजेश रानडे.यांची लोकप्रिय

# कुलस्वामिनी अंबाजोगाई दर्शन यात्रा



## सोबत परळी वैजनाथ

**दर महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार-रविवार.**

**सहल खर्च रुपये**

**रुपये : ३२००/- २एसी, २७००/- ३एसी, १७००/- स्लीपर क्लास**

या मध्ये रेल्वे प्रवास,मिनी बस/सुमो,चहा/नाष्टा व दोन वेळेचे जेवण इत्यादी खर्च समाविष्ट आहे.

---

# exclusive कोस्टल कर्नाटक

## नॉर्थ कॅनरा ते साऊथ कॅनरा ( कारवार ते उडपी )

पंचक्षेत्र : गोकर्ण-महाबळेश्वर आणि शेजेश्वर,धारेश्वर,गुणवंतेश्वर व मुरडेश्वर

नॉर्थ कॅनरा : सदाशीवगड,कारवार,अंकोला,कुमठा,होनावर,येलापूर,सिरसी,बनवासी

साऊथ कॅनरा : कोल्लूर,मरवंथे,कुंदापूर,अन्नेगुडडी,उडपी,श्रृंगेरी,होरनाडू,धर्मस्थळ,कटील,

मालपे व कापू बिच.


मुंबई ते कारवार व उडपी ते मुंबई कोकणरेल्वेने प्रवास

## सहल खर्च रु.७४५०/-

या मध्ये चहा/नाष्टा/जेवण/नॉन एसी बस/नॉन एसी हॉटेल वास्तव्य इत्यादी समाविष्ट आहे.

रेल्वे प्रवास किंवा विमान प्रवास भाडे अधिक

या सहली सोबत येत आहेत




सादर करतील नथुराम ते देवराम

## दिनांक : ११ ते १८ जानेवारी

अधिक माहिती करिता लॉगऑन करा **www.tourways.in**

नोंदणी व अधिक माहिती करीता संपर्क
अनोळखी जगाची ओळख
TOURWAYS
C-305 Palm Acres,M.P.Rd,Mulund east Mumbai 81
आयोजक: राजेश रानडे.
092 23 273 496
022 65 281 281

# मराठे प्रतिष्ठान

## ९ वे अखिल भारतीय संमेलन १ ते ३ मे २००९

### कार्यक्रम पत्रिका

स्थळ : हरिहरेश्वर मंदिर संस्थान, दुर्ग ग्राम, ता.कार्कळ (उडिपी)

**शुक्रवार दि.१ मे २००९**

| | | |
|---|---|---|
| सायं | ४.०० ते ४.३० | नोंदणी |
| | ४.३० | सामूहिक अथर्वशीर्ष पठण |
| | ५.०० ते ७.३० | स्वागत-परस्पर परिचय |
| | ७.३० ते ८.०० | प्रसादम (अल्पोपहार-चहापान) |
| | ८.०० ते ९.३० | विविध गुणदर्शन |
| | ९.३० ते १०.३० | भोजन |
| | १०.०० | विश्रांती व झोप |

**शनिवार दि.२ मे २००९**

| | | |
|---|---|---|
| प्रात: | ७.०० ते ९.०० | चहा नाश्ता |
| | ९.०० ते १२.०० | मराठे प्रतिष्ठान कार्य आणि भावी योजनांच्या संबंधी माहिती-चर्चा |
| दु. | १२.०० ते २.०० | भोजन व विश्रांती |
| | २.०० ते ६.०० | स्थानिक मंदिरांना दर्शन भेट<br>मराठे मिल्क प्रॉडक्ट कुटिरोद्योग केंद्र व अन्य कृषी-केंद्रास भेटी (ऐच्छिक व सशुल्क) |
| सायं. | ६.०० ते ८.३० | विविध विषय विचारमंथन<br>१. चित्पावनांच्या द. कानडा स्थलांतराची ऐतिहासिकता<br>२. कानडी ''मराठे'' मंडळींची दिनचर्या<br>३. द. कानडातील मंदिरांमधील नित्य व प्रासंगिक परंपरा<br>४. ''मराठे'' मंडळींचे सांस्कृतिक कार्य<br>५. बोडण विधीची माहिती (सी.डी. द्वारा) |
| | ८.०० ते ८.३० | प्रसादम (अल्पपोहार-चहापान) |
| | ८.३० ते १०.०० | सांस्कृतिक कार्यक्रम |

**रविवार दि.३ मे २००९**

| | | |
|---|---|---|
| प्रात: | ७.०० ते ९.०० | चहा नाश्ता |
| | ९.०० ते ११.०० | खुला मंच-संमेलनाची फलश्रुती, मतप्रदर्शन, आगामी कार्यांचे विचार मंथन |
| | ११.०० ते १.०० | ''कर्तृत्ववान मराठे'' - सत्कार, समारोप व आभार प्रदर्शन |
| | १.०० ते २.०० | भोजन व निरोप समारंभ |

***(अधिक माहितीसाठी खालील पत्त्यांवर संपर्क साधावा)***

**(1) Sri. Govinda Marathe - Working President of Sammelana**, Madhunivas, Heraje, Mala, Karkala Tq. Udupi. Dist. Karanataka. Landline: 08258-273215. Mobile: 9845340851. **(2) Sri. Satish Marathe - Treasurer.** Vijaya Nivas, Kaje, Heraje, Durga Karkala, Tq.Udupi, Karanataka. Mobile : 9980951974. (3) **Sri. M. Keshava Marathe - Hon. Secretary.** Durga Karkala, Tq.Udupi, Karnataka. Landline : 08258 280977. Mobile : 9880774281. **(4) Sri. Anantha Marathe -** Durga Road, Kaveradka Durga, Karkala, Udupi, Karnataka. Mobile : 9980952008. **(5) Sri. Padmanabha Marathe -** Malehittallu, Durga, Udupi. Landline : 08258-316234 & 287112. Mobile : 9379051151 & 944891203. (6) Shri. Vishnu Murthy Marathe - Landline : 08258-207044, Mobile : 9972331821.

## हितगुज राखीव फंड निधी

'हितगुज' डिसेंबर २००८ च्या अंकात पृ.२१वर अध्यक्षांचे आवाहन प्रकाशित केले होते. त्यात टपालखर्च व छपाईखर्च यात वाढ झाल्यामुळे सर्व आजीव सभासदांनी 'हितगुज' निधी देणगी रिझर्व्हफंडासाठी द्यावी अशी विनंती केली होती. त्या विनंतीला मान देऊन पाहिजे तसा अुदंड प्रतिसाद मिळाला नाही. परंतु ज्या कुलबांधवांनी हितगुज राखीव फंडनिधी साठी प्रतिष्ठानकडे पैसे दिले आहेत. त्यांना खूप धन्यवाद. त्यांची नावे पुढील प्रमाणे सर्वश्री. पुरुषोत्तम वा. मराठे - मिरज, शं.डी. मराठे, ठाणे, चिंतामण मराठे, कळवा (ठाणे), अध्यक्ष मोहनराव मराठे, खार, रमाकांत विद्वांस, मुंबई, श्रीमती राधा ठाकूर,(पृ. ६२३) अंधेरी, श्रीराम व्यंकटेश मराठे (पृ.४३) पुणे, मैत्रेय मंदार मराठे, ठाणे, उल्हास रामचंद्र मराठे, सुरेंद्रनगर (गुजरात).

### कै.चिंतामण बळवंत मराठे यांच्या स्मरणार्थ सामान्यज्ञान स्पर्धेचा निकाल

१) श्री.सदानंद तथा भाऊ मराठे (पृ.५०७), दादर, १०० पैकी ९८ गुण - रू.५००/-

२) सौ.उर्मीला श्रीनिवास (पृ.३८९) - १०० पैकी ९७ गुण - रू.३००/-

३) सौ. शालिनी जाइल - १०० पैकी ९५ गुण - रू.२००/-

सर्व विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन ! त्यांची बक्षिसे १५.०४.०९ पूर्वी त्यांच्या घरच्या पत्त्यावर पाठवली जातील.

## 'मराठे बंधू चौक' नामकरण

गुरुवार, दिनांक ८ जानेवारी, २००९ रोजी मामा परमानंद मार्ग व डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग यांच्या आंतरछेदावरील चौकास (दत्तात्रेय व धुंडिराज हरि) 'मराठे बंधू चौक' असे नामकरण शिवसेना नेते आमदार अरविंद नेरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

# न्यायवैद्यकशास्त्र
# – एक समाजोपयोगी शास्त्र

सर्वसामान्य माणसाला न्यायवैद्यक शास्त्र म्हणजेच फॉरेन्सिक मेडिसिन (FORENSIC MEDICINE) ह्या शब्दाचा असलाच तर अगदी अल्पच परिचय असतो. दूरचित्रवाणीवर रहस्यमय मालिका बघत असताना, 'बॉडी पोस्टमॉर्टेमला पाठवून द्या' असे फर्मान सोडणारा पोलिस अधिकारी त्यांनी बघितलेला असतो व 'अधिक फॉरेन्सिक तपास चालू आहे' हेही खून किंवा बॉम्बस्फोटाच्या बातमीत अैकलेले असते.

फॉरेन्सिक ह्या शब्दाचा अर्थ 'न्यायालयाशी पर्यायाने न्यायदानाशी संबंधित' असा आहे. प्रश्न असा उपस्थित होतो की न्यायालयात, न्यायाधीशांपुढे वकील आपापल्या अशिलांची बाजू मांडतात, युक्तिवाद करतात, पुरावे सादर करतात व मग समोर आलेल्या पुराव्याच्या व कायद्याच्या निकषांच्या आधारे न्यायाधीश न्यायदान करतात. असे असताना न्यायवैद्यक शास्त्राचा व त्यातील तज्ञ डॉक्टरांचा संबंध न्यायदानासाठी कसा येतो! जेव्हा एखाद्या घरात चौरी होते किंवा बँकेवर दरोडा पडतो तेव्हा तपासासाठी पोलिस येतात व त्या वास्तूची तेथील वस्तूंची व परिसराची कसून तपासणी करतात व त्या घटनेसंबधीचे धागेदोरे मिळवण्याचा कसून प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे जेव्हा मानवी शरीराशी संबधित असा गुन्हा घडतो तेव्हा त्या शरीराची, कपड्यांची व आजुबाजूच्या वस्तूंची तपासणी करणे आवश्यक असते. अर्थात् मानवी देहाची तपासणी फक्त डॉक्टरच करू शकतात आणि गुन्ह्याच्या संबधातील तपासणी तर न्यायवैद्यक तज्ञ डॉक्टरच करू शकतात.

बऱ्याच लोकांची अशी समजूत असते की न्यायवैद्यक तज्ञ डॉक्टरचे काम म्हणजे केवळ प्रेतांची चिरफाड करणे. न्यायवैद्यक शास्त्र हे एक उपयोजित शास्त्र असून वैद्यकीय शास्त्रातील अनेक शाखांचे ज्ञान त्यात समाविष्ट असते. बलात्कार, इतर लैंगिक गुन्हे, अपहरण अशासारख्या गुन्ह्यांच्या संबंधातील गुन्हापीडित व्यक्तीची तसेच संशयित आरोपीची वैद्यकीय तपासणी करून अहवाल तयार करण्याचे काम न्यायवैद्यक तज्ञ करतात. जखमी व्यक्तीची तपासणी करून जखमांचे स्वरुप, त्या कशा प्रकारे कोणत्या हत्याराने झाल्या असतील ह्याबद्दलही मत ते देतात. स्मृतीभ्रंश झालेल्या अथवा बेशुद्ध माणसांची, स्वत:चे नावगाव सांगू न शकणाऱ्या बालकांची ओळख पटविण्याचे कामही न्यायवैद्यक तज्ञाच्या अखत्यारीत येते. ह्या प्रकारच्या, जिवंत माणसांच्या तपासणीचा समावेश रुग्णालयीन न्याय वैद्यक शास्त्रात (CLINICAL FORENSIC MEDICINE) मध्ये होतो. न्यायवैद्यक शास्त्राच्या अंतर्गत होणारे, सर्वांना परिचित असणारे काम म्हणजे न्यायवैद्यकीय शवचिकित्सेचे, सर्व अनैसर्गिक व संशयास्पद मृत्यूनंतर केली जाते त्या उत्तरीय तपासणीचे. ह्यालाच पोस्टमॉर्टेम एक्झॅमिनेशन म्हणतात. मृत व्यक्तीबद्दल व मृत्यूच्या घटनेबद्दल उपस्थित झालेल्या अनेकविध प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी व पर्यायाने गुन्ह्याची उकल करण्यासाठी ही शवचिकित्सा उपयोगी पडते. मृताला न्याय मिळवून देण्यासाठी न्यायवैद्यक शास्त्र उपयोगी असते. एखाद्या व्यक्तीचे निरपराधित्व सिद्ध करण्यासाठीही हे शास्त्र उपयुक्त ठरते. घरगुती घातपात/छळणूक, बालकांशी लैंगिक दुर्व्यवहार, नवविवाहितांचा छळ, अत्याचार अशा प्रकरणात सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी झटणारे हे शास्त्र. मृत्यूनंतरही मानवाची सेवा करून मानवतेचे व्रत पूर्णत्वाला नेणारे वैद्यकशास्त्र. आपण तयार केलेला अहवाल घेऊन न्यायवैद्यक तज्ञाला स्वत: न्यायालयात उपस्थिथ होऊन साक्ष द्यावी लागते. एम्.बी.बी.एस्. नंतर न्यायवैद्यक शास्त्र व विषशास्त्र (FORENSIC MEDICINE & TEXICOLOGY) ह्या विषयातील पदव्युत्तर पदवी म्हणजे M.D. प्राप्त करून त्या क्षेत्रात प्रत्यक्ष कार्यानुभव घेणारा डॉक्टर न्याय वैद्यक तज्ञ ह्या संज्ञेस पात्र होतो.

जिवंत अथवा मृत व्यक्तींची तपासणी करून आवश्यकतेनुसार घेतलेले व परिरक्षित केलेले अनेक प्रकारचे नमुने न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे म्हणजे फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीकडे पुढील तपासणीसाठी सुपूर्द केले जातात. खूप आधुनिक उपकरणांनी व अनुभवी, आधुनिक प्रगत तंत्रज्ञानात प्रशिक्षित कर्मचाऱ्यांनी सुसज्ज असलेली ही प्रयोगशाळा गुन्हेअन्वेषणात महत्त्वाचे सहाय्य करते. बी.एस्सी, एम्.एस्सी व काही पी.एचडी, अशा शास्त्रशाखेतील पदव्या घेतलेले कर्मचारी तिथे कार्यरत असतात.


न्यायवैद्यक शास्त्र व न्यायसहाय्यक विज्ञान ह्या दोन्ही आव्हानपूर्ण कार्यक्षेत्रात करियर करण्याची संधी होतकरू तरुणतरुणींना उपलब्ध आहे हे निश्चित् !

**डॉ. सौ. वसुधा आपटे (विद्वांस)**
**(पृ.६२३)**
M.D.LL.B(G)

## मदतीचे आवाहन

कै. बाळाजी हरी तथा बळवंतराव मराठे हे आद्य संस्थापक असलेल्या अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी या संस्थेचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू आहे. कै. बळवंतराव तथा बाळाजी हरी मराठे यांनी चित्पावन ज्ञातीतील गरजू, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यात अडचण येऊ नये त्यांना शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी त्यांची राहाण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था व्हावी या हेतूने दि. २७ मार्च १९३३ ला अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाची स्थापना केली. मंडळाचे पाच लाख रु. अमृत महोत्सव निधी जमविण्याचे अुद्दिष्ट आहे तेव्हा आपल्या वाढदिवसा निमित्त किंवा आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ देणगी देण्याचे आवाहन संस्थेने केले आहे. संपर्कासाठी पत्ता - अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी. २७३३ ब, जोशी पाळंद, सुभाष रोड, रत्नागिरी - पिन कोड - ४१५६१२ दूरध्वनी (०२३५२) २२२०३१.

# पुणे शाखा मराठे प्रतिष्ठानचा २९वा वर्धापनदिन व दैनंदिनी प्रकाशन




*डावीकडून - लेखक कृ.ज. दिवेकर, अध्यक्ष श्री.आनंदराव मराठे (दैनंदिनीचे प्रकाशन करताना) व संपादिका*

पुणे शाखेची २००९ सालची दैनंदिनी प्रकाशन समारंभ थाटामाटात संपन्न.

गुरुवार दि. २५ डिसेंबर २००८ला, गांधर्व महाविद्यालय सभागृह, मेहुणपुरा पुणे येथे मराठे प्रतिष्ठानचा २९वा वाढदिवस आणि पुणे शाखेची म.प्र. ची दैनंदिनी २००९ चे प्रकाशन हे दोन्ही कार्यक्रम पुणेकरांच्या मोठ्या उत्साहाने दरवर्षीप्रमाणेच थाटामाटात संपन्न झाले. मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव मराठे यांच्या शुभ हस्ते दैनंदिनी (डायरी) चे प्रकाशन झाले.

प्रारंभी कुमारी तनया मराठे हिच्या गणेशस्तवनच्या सुंदर नृत्याने कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रसिद्ध लेखक, अेक बंगला बने न्यारा' या कादंबरीचे पारितोषिक प्रदान लेखक श्री. कृष्णाजी जनार्दन दिवेकर, श्री. मिलिंद सुधाकर मराठे यांचे सासरे यांची मुलाखत श्री. गजानन चिंतामण मराठे यांनी घेतली. अेक बंगला बने न्यारा' या कादंबरीचे बीज कसे स्वानुभवावर बेतलेले आहे. हे त्यांनी त्यांच्या आकर्षक शैलीत सांगितले. साहित्यिक लिखाणाची कौटुंबिक पार्श्वभूमी नाही. स्वान्त:सुखाय लेखन करीत गेले. वाचनाची भरपूर आवड आणि प्रबोधनाचा हेतू यामुळे ऑडिटसारख्या त्रासदायक, क्लिष्ट विषयात व व्यवसायात असतानाही लेखनामुळे त्यांचे व्यक्तिमत्व कसे कसे आकारत गेले, फुलत गेले हे त्यांनी सविस्तरपणे आपल्या मुलाखतीत सांगितले. श्री. गजानन मराठे यांनी अशाप्रकारे मुलाखतींतून श्री. कृष्णाजी जनार्दन दिवेकर यांना बोलते केले. श्री. दिवेकर यांनी मुलाखतीच्या शेवटी समस्त मराठे मंडळींचे आभार मानले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष श्री. मिलिंद सुधाकर मराठे यांची, श्रीनिवास मराठे यांनी दिलखेचक मुलाखत घेतली. आपल्याकडे सामाजिक भान नाही. लष्कराच्या भाकऱ्या म्हणून सार्वजनिक कार्याकडे पाहिले जाते. परंतु त्यांना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम करण्याची प्रेरणा त्यांचा मोठा भाऊ सतीश मराठे यांनी दिली. पत्नी सुजाता हिचाही पाठिंबा आणि सासू-श्वसुर दिवेकर यांचे सहकार्य, फ्रेंड फिलॉसॉफर गाईड म्हणून सतिश मराठे यांचे ऋण, त्यांच्या आईवडिलांकडे जातीने पहातात ते जेव्हा विद्यार्थी परिषदेच्या कामासाठी दौऱ्यावर असतात तेव्हा करिअर मार्गदर्शन, विद्यार्थ्यांच्या अडचणी, शिक्षणात काय कमतरता आहे. ज्ञान, कौशल्य-स्कील, शरीर, मन, बुद्धी, आत्मा या पातळीवर मन कसं विकसित होणे आवश्यक आहे ते अत्यंत समर्पक अुदाहरणांनी सांगितलं. सध्याची शिक्षणपद्धती घोका आणि ओका ही कशी चुकीची आहे ते सविस्तरपणे स्पष्ट केले. सिनेमा पाहाणं हा विरंगुळा छंद असल्याचं, तर मधु दंडवते, वाजपेयी आणि प्रमोद महाजन हे राष्ट्रीय आवडते नेते असल्याचे त्यांनी मुलाखतीत सांगितले. या मुलाखतींतून दोन्ही व्यक्तिमत्वाचा सुंदरपट अुलगडत गेला. त्याच्या व्यक्तिमत्वाच्या पैलूंचे दर्शन अुपस्थित मराठे परिवाराला झाले आणि मुलाखत घेण्यामागचा हेतू साध्य झाला असे म्हणावेसे वाटते.

त्यानंतर कार्यक्रमात बहार आणली ती कु. अद्वैत अतुल मराठे यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाने. गांधर्व विद्यालयाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे श्री. प्रमोद मराठे हे गुरु आहेत. ॐकार स्वरुपा, निघालो घेऊन दत्ताची पालखी, कानडा राजा पंढरीचा, काही बोलायाचे आहे पण बोलणार नाही, जरा चुकीचे जरा बरोबर बोलू काही ('आयुष्यावर बोलू काही' या आल्बम मधले गाणे), अशी पाखरे येती, जातो माघारी पंढरीनाथा तुझे दर्शन झाले आता इत्यादी भावमधुर गाणी गाऊन कुमार अद्वैतने श्रोत्यांची मने जिंकली. संवादिनीवर त्याला सौ. मेघना जोशी यांनी तर तबल्यावर त्यांचे पती श्री. जोशी आणि मुलगी सायली हिने टाळाची साथ अुत्तम केली. कु. मानसी मराठे या चिमुरडीने धीटपणे बडबडगीत सादर करून लाड करून घेतले. कु. अद्वैत अतुल मराठे याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच डायरीत 'वेळेचे महत्व' यावर लिहिणारे प्रा. रघुनाथ गोविंद मराठे यांचाही सत्कार केला गेला. डायरी काढावी की काढू नये, किती पृष्ठांची त्याला अन्य पर्याय काय यावर साधकबाधक चर्चा झाली.

श्री. गजानन मराठे हे निवृत्त झाल्यामुळे त्यांनी पुणेरी मिसळपाव व गोड बुंदीचा लाडू आणि कॉफी असा आल्पोपहार ठेवला होता. सर्वांनी याचा आस्वाद घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

❑❑❑

# माझी आई

## (अश्रूत लेखणी भिजवून वाहिलेली स्मृतीसुमनांजली)

**- वा.ग. मराठे** (पृ.५०३)

***'मराठे प्रतिष्ठान'चे प्रवर्तक श्री.वा.ग.मराठे यांच्या मातोश्री दि.१७.१२.२००८ ला निवर्तल्या. मराठे प्रतिष्ठान द्वारा वा.ग.च्या आईला, श्रीमती शारदा गणेश मराठे, भावपूर्ण श्रद्धांजली !***

अशी माझी आई मला लाभली म्हणूनच मी अजून मनाने आणि शरीराने तंदुरुस्त आहे.

माझी आई हा एक आरसा होता. आपले प्रतिबिंब जसे स्वच्छ दिसते तसेच माझे प्रतिबिंब म्हणजे तो एक प्रेमळ आरसाच होता असे म्हणावे लागेल.

मी लहान असताना ३/४ वर्षांचा, तेव्हा गाईच्या गोठ्यात गोप्रद्में काढण्याकरीता आई जात असे आणि गोपद्में काढताना तिच्या पाठीवर मी असे. तिथेच मला वाटते चित्रकला म्हणजे काय? हे मला कळून आले. श्रावण महिना म्हणजे सणवार, आज काय कर आदित्य पूजन, सूर्याबद्दलची माहिती, तेजस्वी, प्रखर तेज, म्हणूनच मला वाटते मी सूर्यपूजक बनलो. सोमवार-भोळा सांब म्हणून मी भोळसट बनलो. मंगळवार हा तर श्रीगणपतीचा आणि देवीचा वार म्हणून मी गणपती भक्त व देवी भक्त ! जिवतीचे व्रत, शुक्रवारी मणगणे, शनिवार शाक्षात मारुती आमचे अंगणात उभाच असे. त्याला शेंदूर लावणे साठी लांबून लांबून लोक येत. तो म्हणे नवसाला पावतो (लोकवार्ता). मी मात्र शेंदूर लावत असे व माझे हात कधीही स्वच्छ होत नसत. शिवाय संपत शनिवार त्यामुळे शुक्रवारी संध्याकाळी निरनिराळ्या फुलांच्या कळ्या वाहणे-पारिजात, जास्वंद, चाफा वगैरे वगैरे. कारण शनिवारी लवकर उठून पिंपळाला जाणे हे महत्त्वाचे आणि नंतर शाळेत जाणे. होता होता श्रावण संपून, नागोबा जाऊन गोकुळाष्टमी ही जाई व गणपती बाप्पा येण्याची घाई होई. इथे सर्वच कोकणवासीयांना घर झाडणे, रंग मातीचा रेवा लावणे, अशी कामे करावी लागत.माळ्यावर नको-नको त्या वस्तू असत कुतुहुल म्हणून प्रत्येक जुनी वस्तु आईला दाखवून पुन्हा तिथल्या तिथेच कसोशीने ठेवली जाई. या कामात आईचे लक्ष्य जरासुद्धा विचलित होत नसे व कामात तर डफरेबाजी चालत नसे. शेवटपर्यंत ती सुईत दोरा घालून शिवत असे. आठवणीत सर्व असे. अस्तापावेतो ती ४/५ माणसांचा स्वैंपाक करून, झणझणीत, चमचमित सांबार-भात करत असे. शेतात असताना आई तर सकाळी जाऊन दुपारी १॥ वाजेपावेतो काम करत असे. ऊन-पाऊस थंड-गरम तिला तमा नसे. कोणत्या कोपऱ्यात कुठले तण उगवतात. त्यापैकी औषधांचे तण-गवत कोणते हे ही माहीत असे. मांजरीचे, कुत्र्याचे, गुरांचे एवढेच काय तर साप, विंचु वगैरे बदलच्या औषधांची तिला माहिती होती. डॉक्टरी औषधांपेक्षाही ती स्वत:च स्वत:वर निरनिराळ्या औषधांचे प्रयोग करी. तिचा निर्धार तिच्या दृष्टीत असे.

लक्ष्यात राहाणारा प्रसंग म्णजे संक्रांतीचे हळदीकुंकु ! या दिवशा श्रीलक्ष्मी-नारायण मंदिरात हळदीकुंकु असले की तिची तयारी दुपारी तीन वाजल्यापासूनच सुरु होई. पहिल्यांदा ती पैठणी टाईप लुगडे काढी, त्यानंतर दागिन्यांची पेटी.ती तर मी आधीच उघडून ठेवत असे. नंतर अंबाडा (खोपा) तिचे लांब सडक काळेभोर केस होते. अजूनसुद्धा तिचे केस काळेच होते. अंबाड्यावर सोन्याचे गुलाबाचे फूल, गळ्यात मोहनमाळ, टिता व पुतळ्या, नाकांत नथ, पाटल्या व बांगड्या हातात पाहून आणि झोकदार नाजूक अलोडिची वेणी (वळेसार) पाहून जेव्हा ती हळदीकुंकवाचं तबक घेऊन चालू लागे तेव्हा तर मला ती बालगंधर्वच वाटत. हे मी आता म्हणतो - तेव्हा कुठे मला माहीत गंधर्व-किन्नर ! गोरी, साधारण घारे डोळे व बेताची उंची शिवाय पूर्वीचे घरी बनवलेले कुंकवाचा टिळा. एक किस्सा आठवतो तो असा की पूर्वीच्या काळी बांगड्या भरण्यासाठी कासार येत ते म्हातारे होते. त्यांचे दात पडल्यामुळे ते कसेतरी बोलत. त्यामुळे कधी कधी मीही अंगात वडिलांचा शर्ट घालून आणि पागोटे व खांद्यावर बोचके घेऊन त्यांची नक्कल करी. ती तेव्हा मला कौतुकाने जवळ घेई. नाटक इथं जन्माला आले.

दिवसभर आई कामात असे व कधी कधी दसरा-दिवाळी अशी चर्चा चाले तेव्हा ती म्हणे दसऱ्यापासून वीस दिवसांनी दिवाळी ! हे वाक्य मात्र मी माझ्या मात कोरून ठेवले आहे. अशा बऱ्याच गोष्टी मी अजूनही मनात ठेवल्या आहेत.

तिला भीती हा शब्द माहीत नाही. अंगणात एकदा वाघ आला तरी ती कंदील घेऊन बाहेर गेली. साप आला तर चुलीतलं जळते लाकूड घेऊन त्याचा समाचार घेई. जंगलात काजू कसे गोळा करावेत, काट्याने काटा कसा काढावा. झाडावर व माडावर कसे चढून, झाडावरच्या झाडावर पेरू, फळे-रामपळे व जांब कसे खावेत. एवंच काय तर नदीत कसे पोहावे हेही मी तिच्याकडून शिकलो. हे मी आज लिहीत आहे. परंतु माझे डोळे मात्र पाण्याने डबडबलेले आहेत, केवळ स्मृती ! म्हणूनच मी लिहीत आहे. लिहिताने अश्रु हेच आशीर्वाद असं मी समजत आहे. ती कधी भडकलेली नसेच मुळी. रात्री झोपण्यापूर्वी ती मात्र बसलेली असे मी झोपून उठलो तरी ती अजूनही कायरे बरं नाही का? असे विचारी. पण मी मात्र तिला तू बसून काय करतेस? मी कुठलेही धाडस करून विचारू शकलो नाही. कदाचित तिचा तो योग असेल !

मराठे परिवार-मराठे प्रतिष्ठान ह्याविषयी तिला काही मराठे विचारीत ती मात्र शांतपणे म्हणे वा.ग. मराठे मुंबईचे ना, अरे तो माझा मुलगा ! एवढेच, जेव्हा मी ''कृतज्ञ, कृतार्थ'' पुस्तक लिहिले आणि मुलाला पुष्कराजला गावाला नेऊन आईला वाचून दाखव म्हणालो तेव्हा तर ती प्रत्येक कडु गोड प्रसंगानाही अश्रुपूर्ण प्रतिसाद देत होती. अशी आई म्हणजे काटेरी करवंदी मोहक आणि ममतेच्या वासाची माऊली असल्याने, निसर्ग, जंगल, समुद्र, धर्म व अर्भ, काम, मोक्ष आकाशातील तारे, ग्रहगोल अशी ती परिपूर्ण होती पणमी मात्र आता अपूर्णच राहिलो. ❑❑❑

## प्रतिष्ठान वृत्त
## *कार्यकारी मंडळ*

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४वा. कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवसी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दि. १२ डिसेंबर २००८ला दत्तजयंतीच्या दिवशी मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या निवासस्थानी प्रतिष्ठानची बैठक भरली. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रव्यवहाराचे बाबत चर्चा झाली.

कार्यवाहांनी अहवालवाचन केले. २८ डिसेंबरला होणाऱ्या सव्वीसाव्या वार्षिक सर्व साधारण सभे विषयी विचारविनिमय झाला.

रत्नागिरीतील अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहायक मंडळाचे कार्यवाह मुंबई विभाग प्रमुख श्री. प्रकाश पां. दामले या बैठकीत अुपस्थित राहिले. कारण या मंडळाचे आद्य संस्थापक कै. बाळाजी हरी तथा बळवंतराव मराठे हे होते आणि या संस्थेला ७५वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्ष निमित्त मराठे प्रतिष्ठान काही आर्थिक मदत देऊ शकते काय. हा हेतू त्यांनी म.प्र.च्या कार्यकारिणीपुढे सांगितला. त्यावर अध्यक्ष मा. श्री. आनंदराव मराठे यांनी प्रतिष्ठान अशाप्रकारे आर्थिक सहाय्य देत नाही. तसा नियम नाही. व्यक्तिगत आम्ही देणगी स्वरुपात आर्थिक मदत करु शकतो. आणि 'हितगुज'मध्ये संस्थेचे संस्थापक बाळाजी हरी तथा बळवंतराव मराठे यांच्याविषयी माहिती देऊन कुलबांधवांनी आपल्या इच्छेनुसार यथाशक्ती संस्थेला मदत करण्याचे आवाहन करू शकतो. असो निर्णय अध्यक्षांनी सांगितला. सुलभाताईंनी आदरातिथ्याने केलेल्या अल्पोपहार चहापानाने सभा संपली.

रविवार दि. २८ डिसेंबरला संध्याकाळी ५ वाज.ता म.प्र.ची माटुंगा येथील दामले योग केंद्राच्या सभागृहात सव्वीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा भरली. कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर दामोदर मराठे, सी.ए. यांनी ताळेबंद हिशेब मांडला. या कार्यक्रमाला निर्माणग्रुपचे संचालक माननीय श्री. अजित श्रीराम मराठे हे आवर्जून अुपस्थित राहिले. त्यांचे स्वागत अध्यक्षांनी केले. श्री. अजितकुमार यांच्या शुभहस्ते गुणवत्ता पारितोषिक देण्यात आली. त्यांनीही थोडक्यात भाषण केले. त्यात कोकणाचा विकास, आंबा, काजू, कोकम यांची लागवड व विक्री याविषयीच्या योजना आणि निर्माणग्रुपचे कार्य याविषयी सविस्तर माहिती सांगितली. सर्वतोपरी प्रतिष्ठानला आपण सहकार्य देऊ असे सांगितले.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे पंच्याहत्तरीत प्रवेश केलेल्या आणि पंच्याहत्तरी ओलांडलेल्या कुलबांधवांचे अध्यक्षांनी सत्कार केले. ७५ आकडा असलेला सुरेख केक या अुत्सवमूर्तींच्या हस्ते कापण्यात आला. अध्यक्षांनी चांदीचे आकर्षक पाण्यावर तरंगणारा दिवा त्यांना भेट म्हणून दिला. प्रतिष्ठानचे पूर्वीपासूनचे कार्यवाह श्री. वि.के. मराठे, वरळी, जलतरणपटू श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे, मुलुंड हितगुजचे संपादक श्री. लक्ष्मणराव मराठे, मुलुंड येथील सिद्धिविनायक सोसायटीत राहणारे श्री. शंकरराव मराठे आणि त्यांच्या सौभाग्यवती सत्कारमूर्ती होते.

कु. योगिनी काशीनाथ मराठे, दादर हिने ७वीच्या स्कॉलरशीप परीक्षेत ३०० पैकी २१५ गुण मिळवून अुत्तम यश संपादन केले त्याबद्दल तिला प्रमुख पाहुणे मा. श्री. अजितकुमार मराठे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. गुणवत्ता पारितोषिके मिळविलेल्या मानकऱ्यांमधे कु. योगिनी ही अेकमेव विद्यार्थीनी या कार्यक्रमाला अुपस्थित होती. म्हणून तिचे विशेष कौतुक केले गेले.

श्री. वि.के. मराठे, श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे, श्री. लक्ष्मणराव, श्री. शंकरराव यांनी त्यांचा सत्कार केल्याबद्दल आपल्या छोटेखानी भाषणातून कृतज्ञता व्यक्त केली.

अल्पोपहार, कॉफीपान झाल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली या कार्यक्रमाला अुपस्थिती अत्यंत कमी होती ही खेदाची गोष्ट वाटते. त्यामुळे कार्यक्रम पार पडला पण समाधान वाटले नाही.

शुक्रवार दि. ९ जानेवारी २००९ला प्रतिष्ठानची बैठक मराठे अुद्योग भवनात दुपारी ४ वा. भरली. कार्यवाहांनी अहवाल वाचन केले. पत्रोत्तरे वाचली. शैक्षणिक मदत पाहिजे आहे म्हणून अेका कुलबांधवांचा अर्ज आला होता त्यावर चर्चा होऊन त्याला प्रतिष्ठान आर्थिक मदत करील. कर्ज म्हणून परतफेडीच्या अटीवर ही मदत देता येईल असे ठरले. हितगुज देणगी अधिकाधिक मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जाहिराती मिळविल्या पाहिजेत असे ठरले. कै. सुरेशभाऊ मराठे यांचा स्मृतीदिन कार्यक्रम कधी करायचा कसा व कुठे करायचा यावर चर्चा झाली. पुढील सभा शुक्रवारी दि. ६ फेब्रुवारीला ठाणे येथे अध्यक्ष श्री. आनंदरावाच्या घरी घेण्याचे ठरविण्यात आले. ***(पृ. १४ वर)***

### मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८ (मुं.) दि.१२.१.८१
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५.)

**ई-मेल :**
maratheparivar@yahoo.co.in

**वेबसाईट :**
www.marthepratishthan.org

आजीव सभासद व हितगुज तहहयात वर्गणीदार होण्यासाठी करावयाचा अर्ज

**(नमुना)**

मराठे प्रतिष्ठानची घटना व नियमांनुसार मी मराठे प्रतिष्ठानचा आजीव सदस्य व हितगुज या त्रैमासिक मुखपत्रासाठी तहहयात सदस्य होऊ इच्छित आहे.

आजीव सदस्य वर्गणी रु.१०० व हितगुजची तहहयात वर्गणी रु. २०० मिळून एकूण रु.३०० सोबत रोख / मनीऑर्डरने / मुंबईतील बँकेवर काढलेल्या डिमांड ड्राफ्टने / चेकने पाठवीत आहे.

ड्राफ्ट/चेक क्रमांक दिनांक
बँकेचे व शाखेचे नाव:
सही
संपूर्ण नांव:
जन्मतारीख
पत्ता:
पिनकोड
टेलिफोन/सेल
ई-मेल:
व्यवसाय/नोकरी पूर्ण तपशीलासह
कार्यालयीन पत्ता :
कार्यालयीन टेलिफोन व इ-मेल

*(वि.सू.- विवाहित सासुरवाशिणींनी पतीचे संपूर्ण नाव व पत्ता, तसेच माहेरवाशिणींनी पित्याचे संपूर्ण नाव व पत्ता कळवावा.)*

# मि. श्रीकांत साने

**लेखक : विनायक केशव मराठे (पृ.२०)**
**सी/४, स्वप्नसाफल्य,वरळी बस डेपोजवळ, वरळी**
**मुंबई-४०००३०.**

आपल्या आयुष्यांत काही माणसं एखाद्या धूमकेतूप्रमाणे अचानक येतात. आपल्या चांगल्या वाईट वागण्यांनी ती आजूबाजूचे वातावरण ढवळून टाकतात. इतरांना पूर्ण समजण्या अगोदरचज्या वेगाने ती येतात त्याच वेगाने निघून जातात. जाताना आपल्या भल्या बुऱ्या आठवणींचा पिसारा फुलवीत जातात.

असाच एक लक्षात राहणारा. नव्हे मनाला चटका लावणारा धूमकेतू माझ्या आयुष्यात येऊन गेला. तिरस्काराच्या काळ्याकुट्ट ढगातून बाहेर पडून सहानभुतीच्या आपुलकीच्या सूर्यकिरणांत येता येताच टिपं गाळणाऱ्या आठवणींचा पिसारा फूलवित तो दूर दूर निघून गेला. मि. श्रीकांत साने सारखा धूमकेतू तुमच्याही आयुष्यात कदाचित आला असेल. आठवून पहा.

उद्योगाची सुद्धा एक नशा असते. मनासारख्या गोष्टी जुळत गेल्या की उंच-अधिक उंच भरारी मारण्यासाठी उद्योजक अधीर होतो.

आम्ही - हे आदरार्थी बहूवचन नाही बरं. आम्ही म्हणजे मी स्वत:, माझे उपकारकर्ते, गुरु, नंतर सासरेबुवा पि.वासुदेवराव आणि माझे जिवाभावाचे सहकारी मिळून आम्ही. मिळत गेलेल्या यशामुळे उत्साहाने निरनिराळे प्रकल्प सुरु केले. गरज पडेल तशी कार्यपद्धती अनुसरली, गरज भागली तरी आधुनिक पद्धतीने अभ्यास करून प्रकल्पांच्या भविष्यकालीन गरजा हेरून दीर्घकालीन कार्यपद्धती निश्चित करण्याकरता निष्णात अधिकारी नेमून एक स्वतंत्र विभाग स्थापन करावा असा निर्णय आम्ही घेतला. केवळ प्रामाणिक, कष्टाळू, सुचनेप्रमाणे तंतोतंत काम करणारी माणसं आमच्या वाढत्या गरजा भागवू शकत नव्हती. आधुनिक व्यवस्थापनशास्त्र जाणणारी स्वतंत्र विचार करणारी वेळप्रसंगी वरीष्ठांशी परखडपणे पण मृदू शब्दात आपले विचार पटवून देणारी माणसे आम्हाला अपेक्षित होती.

इंग्रजी वर्तमानपत्रांत आम्ही जाहिरात प्रसिद्ध केली. भरपूर वेतन व इतर सवलती आम्ही देणार होतो. अटीसुद्धा कडकच होत्या. उगीच ढीगभर अर्ज आम्हाला अपेक्षित नव्हते.

तरीसुद्धा जवळ जवळ शंभर अर्ज आले. काट छाट करून दहा अर्जदार मुलाखतीसाठी पसंत केले. थोरामोठ्यांच्या चिट्ट्या, खास निरोप असलेले सर्व अर्ज बाजूला सारले गेले. ही चाचणी करताना एक मजेशीर अर्ज आढळून आला. एका फालतू मळकट कागदावर हा अर्ज लिहिलेला होता. अर्जासोबत आवश्यक प्रती व एका चुरगळलेल्या कागदावर लिहिलेलं एक टिपण होतं. असला भिकार अर्ज म्हणजे आमचा एक तऱ्हेने उपमर्दच होता. कचऱ्याच्या डब्यात टाकून देण्याच्या विचारात असताना डॅड - मी वासुदेवरावांना डॅड म्हणत असे. हा अधिकार फक्त माझाच होता. इतर त्यांना मि.वासुदेवराव म्हणत - सहज गमतीने म्हणाले 'रावसाहेब - फक्त डॅड मला रावसाहेब म्हणत असत - ''पाहू या तरी या गबालेमहाराजांनी टिपणात काय दिवे पाजळले आहेत ते.''

मी नाईलाजाने तो अर्ज डॅडकडे सरकवला - दाणे टिपताना पाखरं धिंगाणा घालतात तशी अक्षरं अर्जभर विखूरली होती. अर्ज सरकवताना मी सहज उलगडून पाहिला. स्वारी एम्.कॉम्. परीक्षेत सर्वप्रथम आली होती. सुवर्णपदक पटकावलं होतं. स्वारीचं नांव श्रीकांत साने होतं उपनगरातल्या कुठल्याश्या नगरात, कुठल्याश्या सोसायटीत त्यांचं वास्तव्य होतं. असला भिकार अर्ज डॅड फार वेळ हातात धरणार नाहीत याची खात्री होती.

डॅडनी अर्जावर बारीक नजर टाकली आणि चक्क टेबलावरची मॅग्नीफाईंग ग्लास हातात घेऊन अर्जावरची नजर ढळू न देता ते खूर्चीत सावरून बसले. हातातला ग्लास व चष्मा रूमालानी पुसून ते कागदपत्र वाचू लागले. माझी उत्सुकता वाढू लागली. कोणत्या क्षणी अर्ज टेबलावर टाकून देणार याची वाट पहात होतो. पण त्यांचा चेहरा फुलला. भुव्या मधून मधून वर डोकावत होत्या. काय होतं त्या भिकार कागदपत्रात ?

कागदपत्र टेबलावर ठेवीत पुन्हा चष्मा पुसत डॅड म्हणाले, ''रावसाहेब हा माणूस जिनियस आहे. घाणेरडे कागद वापरून हा आमचीच परीक्षा घेतोय. पण आमचे केस काही उन्हानी पांढरे झाले नाहीत. बस्स या माणसाला आपण जरूर बोलावू या.''

केवळ डॅडसाहेबांचा आग्रह म्हणून श्रीकांतला मुलाखतीसाठी बोलावणं पाठवलं. मुलाखती घेताना डॅडसाहेबांचा आग्रह म्हणून त्याचा नंबर शेवटी ठेवला. कडक चाचणी करून बोलावलेल्या उमेदवारांनी सुद्धा आम्हाला निराश केले. त्यांनी केवळ पुस्तके वाचून तयारी केली होती. त्यांचं ज्ञान अद्ययावत नव्हतं. आपले अज्ञान कबूल करण्याऐवजी ते संदर्भरहीत चूकीची उत्तरे देत होते. काही उमेदवार तर मोठ्या व्यक्तींशी त्यांचा कसा घरोबा आहे ते आडवळपणाने सांगत होते. त्या सगळ्यांना बाहेर पिटाळीत गाडी शेवटच्या उमेदवारापर्यंत पोहोतली.

श्रीकांतला निरोप गेला. गबाळेमहाराजांची आम्ही आतुरतेने वाट पहात होतो.

नववधूच्या बावरलेल्या नजरेनी स्वारी एक एक पाऊल पुढे सरकवीत हॉल मध्ये आली.

चुरगळलेली ढगाळ पॅन्ट, अगदी दारूच्या नशेतसुद्धा कुठल्याही शिंप्यानी अशी पॅन्ट शिवली नसती. पॅन्टमध्ये कसाबसा कोंबलेला तितकाच ढगाळ शर्ट. पॅन्ट व शर्ट यांचे संबंध टिकवून ठेवणारा आवळून बांधलेला जुनाट बेल्ट. कंठलंगोटी शब्द सार्थ करणारी सतरा ठिकाणी चुरगळलेली लंगोटी उर्फ नेकटाय. हातात पिढ्यानपिढ्या वापरलेली बहुरंगी मळलेली पिशवी असलं हे ध्यान समोर उभं राहिल्यावर डॅडसाहेबांनी त्यांना न पाहता गबाळेमहाराज का म्हटलं ह्याच उलगडा झाला.

श्रीकांत आमच्या टेबलासमोर लोंबकळत उभे होते. नजर जमीनीवरच्या लाद्या मोजीत होती.

मला ते पहावेना

'वेलकम मि. साने प्लीज टेक युवर सीट' मॅनेजरने ती म्हणायची वाक्ये मी म्हणून टाकली.

श्रीकांतने तत्परतेने मुलायम शब्दात आभार मानले. आजूबाजूला अस्ताव्यस्त पडलेल्या खुर्च्या जागेवर ठेवल्या (डॅडसाहेबांनी नोकराकरवी मुद्दामच खुर्च्या आडव्या तिडव्या

ठेवल्या होत्या. उमेदवाराला शिष्टाचाराची ओळख कितपत आहे याची ती चाचणी होती. खुर्चीला पाठ टेकणारा नाही या अंदाजानी आमचे पुन्हा आभार मानीत स्वारी खुर्चीवर अलगद बसली.

डॅडसाहेब खुदकून हंसले. श्रीकांतने पहिली फेरी सहज जिंकली होती. बाकीचे उमेदवार सपशील पडले होते.

डॅडसाहेबांनी माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेनी पाहिले. वास्तविक प्रथम गोलंदाजी मॅनेजरसाहेब करीत असत. मी गोलंदाजीला सुरुवात केली. व्यवस्थापन हा माझा आवडीचा प्रांत.

पण कसचं काय !

मी विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी अचूक उत्तरं दिलीच पण मी विचारलेले काही प्रश्न हे कालबाह्य आहेत असेही त्यांनी खुबीने दाखवून दिले. व्यवस्थापन नुसते कामापुरते मर्यादित नाही ते मानवी मनोव्यापारानाही स्पर्श करते हा सिद्धांत मांडून श्रीकांत माझेच बौद्धिक घेऊ लागले. मुलाखत घेणारा कोण आणि देणारा कोण हाच प्रश्न निर्माण झाला.

मार्केटिंगचा माझा अभ्यास गरजेपुरता होता. या क्षेत्रातला एखादा गुगली टाकून बघण्याचा मी प्रयत्न केला.

''सॉरी सर, मला तुमच्या विचारांशी सहमत होता येत नाही. मग उत्तर कसं देणार ? या महिन्याच्या अमेरिकन जर्नलमध्ये एक जाहिरात आली आहे, अर्थात आपल्या वाचनात ती आली असेलच. मार्केटींगचा तो एक आदर्श पाठच आहे आपलं काय मत आहे ?''

अरे बापरे, हा तर माझीच उलटतपासणी घेत होता.

''मि. नारायणच काय पण मी सुद्धा याच मताचा आहे'' डॅडसाहेबांनी वेळ मारून नेली मुलाखतीची सुत्रं आपल्या हातात घेतली.

त्यानंतर जवळ जवळ पंचवीस मिनिटं त्या दोघांचं तुंबळ वाङयुद्ध झालं.

''वेल डन मि. श्रीकांत. आपण बाजूच्या केबिनमध्ये बसता कां ?''

डॅडसाहेबानी युद्धसमाप्ती जाहीर केली.

खिशातून रूमाल काढून चष्मा पुसत डॅड म्हणाले ''रावसाहेब आज मी खूष आहे. आपल्याला पाहीजे तसा माणूस मिळाला. तुमच्यावर सर्व कारभार सोपवून मी मोकळा झालो आहे. तरीपण अपवाद म्हणून माझी एक विनंती आहे.

''अहो विनंती कशाला ? तुम्ही आदेश द्या म्ही त्याची ताबडतोब अंमलबजावणी करू.''

''आपण वर्तमानपत्रात मान्य केलेल्या पगारात माझी खास शिफारस म्हणून किमान पाचशें रुपयांची भर घालू या.''

''जरूर. जरूर'' मी मॅनेजरसाहेबांकडे पहात दुजोरा दिला. मॅनेजरसाहेबांनी होकारार्थी मान हलविली.

''रावसाहेब. आणखी एक गोष्ट. श्रीकांत मानसीक तणावाखाली दिसताहेत. त्यांना आपण समजून घेलतं पाहीजे. त्यांच्या लक्षात न आणता त्यांना आपणाला अंतर्बाह्य बदललं पाहिजे. त्यांच्या विचाराची झेप फार मोठी आहे. कोणत्याही परिस्थितीत आपण या माणसाला अंतर देता कामा नये.''

हातात नेमणूक पत्र पडल्याबरोबर श्रीकांत जवळ जवळ धांवत माझ्या केबिनमध्ये आले.

'सर,.....'

'मि. श्रीकांत आता तुम्ही आमच्या नव्हे आपल्या उद्योग परिवारातले जवळ जवळ सहकारी झाला आहात. आपल्या परिसरांत सर, साहेब, बॉस, मालक ही शब्दावळ वापरीत नाहीत. प्रथम मि. नंतर समोरच्या व्यक्तीचे नांव-आडनांव नाही घेतात...

'मि. नारायण...'

'करेक्ट...'

'आपण जवळ जवळ शब्द वापरून मला निर्णय घेण्याची संधी दिलीत. याबद्दल आभार. मला आपण दिलेल्या नेमणूक पत्रात एक टायपींग एरर दिसतेय....'

''टायपींग एरर ? शक्यच नाही. ते नेमणूक पत्र मी स्वतः डिक्टेट केलंय. कुठे आहे ती चूक ?''

''पगाराच्या आकड्यात जाहिरातीत आपण देऊ केलेला पगार आणि या पत्रातील पगार यात चक्क पांचशे रुपयाचा फरक आहे.''

''आलं लक्षात आलं. पांचशे रुपये अधिक पगार आहे. कमी नाही. पगार कमी दिला तर फसवणूक होईल. नाही कां ?''

''आपण नकार द्यायला कुठे संधीच ठेवली नाही. तरीसुद्धा हा वाढीव पगार कोणत्या आधारावर मिळणार आहे. तेच कळत नाही. कामाचा प्रत्यक्ष अनुभव सांगण्यपुरताच आहे. मी काही उत्पादनतज्ञ नाही. त्या बाबतीत माझे काही ठाम विचार आहेत. पण प्रत्यक्षात आणलेले नाहीत. माझे टिपण कदाचित आपणा सर्वांना आवडले असेल. पण ते सर्वसाधारण स्वरुपाचेच होते. ठीक आहे. हाही एक अनुभवच आहे.

''अनुभव सुखद आहे ना ?''

''निश्चितच. खरं सांगू ? मला पगार कमी मिळाला असता तरी नकार देणं मला शक्य झालं नसतं. हे आपुलकीचे पाश तोडणं कठीण काम आहे. मनी इज नो प्रॉब्लेम फॉर मी. मी हे भंपकपणे सांगत नाही. कोणत्याही परिस्थितीत राहण्याची मला अगदी लहानपणापासून सवय आहे. लोकांच्या तिरस्काराचे घाव झेलीत माझ्या संवेदना बोथट झाल्या आहेत. तोंड उघडण्याअगोरदरच मला बाहेरचा दरवाजा दाखविण्यात आला आहे. पण मि. नारायण मी निराश मुळीच झालो नाही. मी अंतर्मुख झालो आहे. मला एक विलक्षण दृष्टी प्राप्त झाली आहे. समोरची व्यक्ती कितीही महागड्या मोटारीतून फिरत असली, श्रीमंती पोशाखात मिरवत असली तरी मी एकाच दृष्टीक्षेपात त्याच्या अंतरंगात जाऊन पोहोचतो आणि बहूतांशी ते ओंगळच असतं. अगदी अपवाद म्हणून ते बाह्यांगाशी मिळतं जुळतं असतं. छे! मी फारच बडबडत राहीलो. मि. नारायण माझी आपल्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची खूप इच्छा आहे.''

''मग कामाला कधी सुखात करणार ?''

''सुरवात झालीच आहे म्हणाना.''

''दॅटस् दी स्पिरीट. मि. श्रीकांत मला आपली फारशी माहिती नाही. पण ती आज ना उद्या होईल. माझ्या मते तुम्हाला उत्तरोत्तर पगार निश्चितच वाढत जाणार. वागणूक सन्मानपूर्वक मिळेल याची खात्री मी देतो. आता व्यावसायिक शिस्त म्हणून काही गोष्टी आंगकिराव्या लागतात. मग त्या आपल्याला मान्य असोत वा नसोत. भले आध्यात्मात बाह्यांगाला महत्त्व नसेल पण आजूबाजूच्या जगात विशेषतः व्यापार उद्योग परिसरात बाह्यांगाला म्हणजे पोशाख, हसरा चेहरा मधाळ भाषा याला फारच महत्त्व आहे. मि. श्रीकांत मला वाटतं तुम्ही पूर्वायुष्य हे वाईट स्वप्न समजा आणि त्या स्वप्नातून जागे होऊन नव्या अवतारात आमच्या परिवारांत सामिल व्हा.''

''सदिच्छेबद्दल आभार. माझे पूर्वायुष्य केवळ पूर्वस्मृती नाहीत. ते एक भयानक सत्य आहे. माझं जीवन ही बहूतेक शोकांतिका होणार. जाऊं द्या. पोशाखाविषयी म्हणाल तर

ती एक निराळीच गोष्ट आहे. सांगेन केव्हांतरी.''

श्रीकांत आमच्या परिवारात सामिल झाले आणि साखर दुधात विरघळावी तसे ते आमच्यात विरघळून गेले.

त्यांचा आत्मविश्वास एवढा दांडगा होता. बौद्धिक ताकद एवढी जबरदस्त होती की आमच्या अपेक्षा, आमचे आखाडे यांना ओलांडून यश प्राप्त होत होते. मुख्य म्हणजे त्यांना दूरदृष्टी होती. ते मॅन ऑफ व्हीजन होते. माझे, डॅडसाहेबांचे विचार, सुचना आणि वस्तुस्थिती यात जेव्हा फरक पडे त्यावेळी ते आम्हाला न दुखवता त्यांच्या आराखड्याप्रमाणेच अंमलबजावणी करीत पण श्रेय मात्र उगीचच आम्हाला देत असत.

त्यांची काम करण्याची पद्धत विलक्षण होती. वास्तविक ते व्यापारी हिशोब, व्यापारी अंदाज, आर्थिक बाजू सांभाळण्याऱ्या क्षेत्रातले. पण चकीत करणारे निरीक्षण आणि अभ्यासूवृत्ती यामुळे ते सर्वच क्षेत्रात एक्सपर्ट बनले. कनिष्टांच्या लहानसहान सूचना ते लक्ष्यपूर्वक ऐकत. अगदी त्यांच्या आवडत्या तपकीरी डायरीत नोदं करून ठेवीत. वेळप्रसंगी त्यांचा उपयोग करीत. मग त्या माणसाला भले तो साधा कामगार असो वा अधिकारी. बोलावून त्याचे कौतुक करीत. त्याला नव्हे त्याच्या कुटुंबियांना एक सुंदरशी भेट पाठवीत. उद्देश त्यांच्या कुटुंबियांनासुद्धा ही गोष्ट समजून यावी.

श्रीकांतच्या किती गोष्टी सांगाव्या ? एक का दोन ? त्यांनी आमच्या ऑफीसचा, कारखान्याचा चेहरामोहराच बदलून टाका. जुनाट अवाढव्य टेबलं, गबाळ्या खुर्च्या, उघड्या रॅकवर रचलेलं रेकॉर्ड. बसल्या जागेवरूनच एकमेकांशी बोलणारा स्टॉफ आणखी कितीतरी गोष्टी इतिहासजमा झाल्या. सुंदर रबरी टाईल्स, आटोपशीर बदामी रंगाचं फर्नीचर. प्रत्येक टेबलावर इंटरकॉम, ठराविक वेळानी चहा, कॉफी वा अन्य पेय हवं कां याची इंटरकॉमवरच विचारणा या गोष्टी आल्या. ड्रेस कोड नाही पण शक्य तो पांढराशुभ्र पोषाख, पुरुषांना नेकटायची सक्ती या गोष्टी त्यांनी रूढ केल्या. त्यासाठी खास भत्ता पगाराला जोडण्यात आला. यंत्रानी माणसं कमी झाली नाहीत नविन प्रकल्प सुरू केले व माणसांना सामावून घेण्यात आलं. पण एवढी उलथापालथ होऊनसुद्धा गबाळेमहाराज बदलले नाहीत.

माझ्या व श्रीकांतच्या वेव्हलेंथ चांगल्याच जुळल्या होत्या. खरं सांगू ? स्वारी रंगात आली की त्यांनी वाचलेल्या साहित्यातील सुंदर उतारे ते सहज म्हणून दाखवीत. कधी कधी विनोदांची अगदी चारचौघात अश्लील वाटणारे विनोदांची देवाणघेवाण होत असे. आणि हीच खरी इंटीमसीची जवळकीची खूण होती.

आणि एक दिवस मी ऑफीसमध्ये आल्या आल्या श्रीकांतना माझ्या केबिनमध्ये बोलावून घेतलं.

काहीश्या गोंधळलेल्या चेहऱ्यानी श्रीकांत अगदी दारावर टक्‌टक्‌ न करता केबिनमध्ये घुसले.

''मि. नारायण. तब्येत ठीक आहे ना ? संकोच मुळीच बाळगू नका. घरी आराम करा. मी आहे ना ?''

''छे ! छे ! मि. श्रीकांत मी अगदी ठणठणीत आहे.''

''मग काही अर्जंट काम ?''

''छे ! ते ही नाही.''

''ठीक. मग तुमच्या संमतीने मी निघतो. तिकडे बदलापूरला मोठ्ठा प्लॉट घेऊन ठेवलेला आहेना. त्या बाबतीत मार्केटींग सर्व्हे पुरा झाला आहे. एक वेगळाच विचार आहे. पुढल्या पंधरा दिवसांत कंपलीट प्रपोजल तुमच्या आणि मि. वासुदेवरावांच्या समोर ठेवतो. केव्हांही हांक मारा. आय् एम् अॅट युवर सर्विस सर.''

''अरे, हो. हो. मला काही बोलू द्याल की नाही !''

मि. श्रीकांत आज मी तुम्हाला एक खास विनंती करणार आहे. आपण एवढे दिवस एकच काम केलं पण एकमेकांविषयी आपणाला फारच कमी माहिती आहे.''

''पण त्यामुळे काही अडलं आहे कां ? ऑफीसच्या गोष्टी ऑफीसमध्ये घरच्या गोष्टी घरी...''

''म्हणजे अगदी वॉटरटाइट कंपार्टमेंट ?''

''हो म्हणा तसं पाहिजे तर''

''पण तरीसुद्धा मी एक विनंती करणार आहे. उद्या संध्याकाळी तुम्ही माझ्याकडे माझ्या घरी जेवायला येणार आहात. नाही म्हणण्याचा प्रश्नच नाही. हॉटेलमध्ये जेवणं मला मुळीच पसंत नाही. आपण कधी एकमेकांकडे जेवलोच नाही. एकमेकांच्या आवडीनिवडी माहीत नाहीत. ते जाऊ द्या. मला तुमची आवडीची स्वीट डीश सांगा.''

''अहो स्वीट डीश म्हणजे स्वीट डीश ती स्वीट असावी. ओव्हरस्वीट असू नये. एवढंच.''

''थँक्स मि. श्रीकांत. माझं आमंत्रण आपण स्विकारलत फार बरं वाटलं मला.''

''अरेच्या मी कुठं हो म्हटलं ? तुम्ही नामांकीत वकील झाला असतात मि. नारायण. वकील व्हायचं सोडून कुठे उद्योजक बनात. बाकी उद्योजकांनासुद्धा हे तंत्र उपयोगी पडतंच. स्वीटडीशचं आमिष दाखवून तुम्ही माझा होकार गृहीत धरलात.''

''अहो तुम्ही काय आणि मी काय ? कितीही सोवळंभाडं लपवलं तरी आपण ब्राह्मणच ना. मग भोजनप्रिय असणारच. समोरच्या ताटातल्या जिलब्या लाडवावरचं आपलं लक्ष्य अगोदरक जातं. खरं ना ?''

तुम्ही आणि मी ब्राह्मणच ना हे शब्द बाहेर पडल्यावर का कुणास ठाऊक श्रीकांत क्षणभर चमकले.

''मि. नारायण निदान तुमचं आमंत्रण तरी मी नाकारू शकत नाही. त्यासाठी स्वीट डीशची लुडबुड हवी कशाला ? श्रीमंत काही माझे शत्रू नाहीत. श्रीमंत जरी नाही तरी उच्च मध्यम वर्गीयाचं आयुष्य मी नक्की जगू शकेन.''

''मग जगा ना ? का जगत नाही ?''

''कां जगत नाही ! याचं उत्तर कधी ना कधी मला द्यावंच लागेल. पण आता नाही.''

''जशी आपली मर्जी. सध्या आपला होकार पुरेसा आहे. थँक्स. तुमचा वेळ घेतला त्याबद्दल मी दिलगीर आहे.''

खरं भोजन म्हणजे एक निमित्त होतं. ऑफीसच्या कामाच्या रगाड्यात श्रीकांतना बोलकं करणं अशक्यच होतं. शिवाय या शिस्तीच्या शिलेदाराला ते आवडलं नसतं.

गाडीत गप्पा सुरू झाल्या. ऑफीस सोडून इतर अनेक विषयांना स्पर्श झाला. श्रीकांत मूडमध्ये आलेले पाहून मी हळूच एक गुगली चेंडू टाकला.

''श्रीकांत समजा एखाद्या मित्रांनी एखादी चांगली गोष्ट आपल्यासाठी करायचं ठरवलं तर आपण का हरकत घ्यावी ?''

''घेऊच नये. पण हा टोप्या भिरकवण्याचा खटाटोप कशाला ?''

''बघतो एखादी टोपी माझ्या मित्राच्या डोक्याला फिट्ट बसते कां.''

''छे ! माझ्या डोक्याला कोणतीच टोपी फिट्ट बसणार नाही.''

''कां ?''

''कारण डोकं माझं आहे.''

आणि आम्ही दोघेही खळखळून हसलो.

''मि. नारायण. तुमचं घर पार्ल्याला आहे ना ?''

''हो. मग ?''

''अहो, गाडी फोर्टकडे चालली आहे. बरोबरीचा मित्र असता तर विचारलं असतं...''

''काय विचारलं असतं ?''

''जाऊ द्या. दुसऱ्या बिऱ्हाडाचा नेहमीचा जोक मारला असता.''

''हात्तीचा. मग मारा ना. जोक. मी तुमच्या बरोबर आहेच. बरोबरीचा माना म्हणजे झालं. श्रीकांत मी नक्की हा जोक मनापासून एन्जॉय केला असता. चर्चगेटला एका मित्राला भेटायचं आहे.ते काम आटपू आणि गाडी घराकडे वळवू.''

खरं म्हणजे काम श्रीकांतचंच होतं. माझा टेलर फोर्टमध्ये होता. ला-फान्स ह्या प्रख्यात टेलरींग फर्ममध्ये माझं खातं होतं. म्हणजे माझ्या खात्यात माझ्या अंगाची निरनिराळी मापं नोंदलेली होती. वेळोवेळी ती अपडेट करावी लागत. फोन केला की मि. लोबो (ला फ्रान्सचा माणूस) कॅटलॉग घेऊन माझ्या घरी येई. मी कापड पसंत करत असे. तयार ड्रेस लोबोच आणी. मी आणि लोबोनी कट केला श्रीकांतच्या अंगावर सूट चढवायचाच.

गाडी ला-फान्स कंपनीजवळ आली. फुटपाथला गाडी लागली.

''श्रीकांत उतरा ना.''

''छे ! माझं काय काम आहे ?''

''कमाल आहे. अहो नवऱ्या मुलाशिवाय लग्न कसं लागणार ?''

''म्हणजे ?''

''सांगतो. सांगतो. पण अगोदर चटकन् उतरा. ट्राफीक पोलीस शिटी फुंकत येईल.''

''मि. नारायण टेलरींग दुकानात माझं काय काम आहे ?''

''कमाल आहे एखादा मित्र चांगलं काम करीत असेल तर तुमची हरकत नाही ना ?''

जवळ जवळ मी श्रीकांतना ढकलीत दुकानात नेलं. लोबोनी भराभर मापं घेतली.

भानूला (सौ.ला) मी फोन करून घरी येत असल्याची खबर दिली.

पाहूण्याला घर दाखवण्याची लहानपणातली खोड अजूनही टिकून होती. भानूला वाचनाची आणि उत्तम पुस्तकं जमा करण्याची दांडगी हौस. तिची स्वतंत्र स्टडी होती.

घर दाखवताना मी सहज स्टडीचा उल्लेख केला. श्रीकांतनी उत्सुकता दाखवली. मी भानूची संमती घेऊन तिच्या स्टडीमध्ये आम्ही गेलो. भानूनी तयार केलेला कॅटलॉग पाहताना श्रीकांत स्वत:ला विसरून गेले.

''मि. नारायण किती सुंदर कलेक्शन आहे. वाटतं सर्व व्याप सोडावेत आणि वाचत बसावं दिवसभर''

''आपल्या अभिप्रायाबद्दल धन्यवाद. पण एक सुधारणा. ही स्टडी माझी नाही. सौ. भानूची आहे.''

नाही नाही म्हणत भानू माझ्याशेजारी उभी होती. तिच्याकडे मान वळवून श्रीकांत म्हणाला 'पदवी परीक्षेला कोणता विषय घेतला होतात ?''

''बी.ए.ला फिलॉसफी. एम.ए.ला सायकॉलॉजी. पी.एच.डी.ला पाहू कोणता विषय घ्यायचा. संसार सांभाळून जमणं कठीण आहे.''

''औद्योगिक मानसशास्त्रला खूप स्कोप आहे. या विषयाला काळ, स्थळ याचं बंधन नाही. जगाच्या पाठीवर कोठेही माणूस असो. तो रागावणार, प्रेम करणार, द्वेष करणार उघडपणे करता आलं नाही तर आतल्या आत जळत राहणार. खरं की नाही. आणि अश्या माणसांचा समूह असला तर समूहाचं मानसशास्त्र हा एक वेगळाच प्रांत तयार होतो.

''सध्या मी कोपरकरशास्त्रींकडे पातंजळच्या ग्रंथाचा अभ्यास करते आहे.''

''फार छान. मॅडम. आपण निवडलेला विषय आणि आपली अभ्यासाची पद्धत अगदी योग्य आहे. इंग्रजी भाषेत मानसशास्त्राचा अभ्यास करून पण प्रतिभा जागृत ठेवून खूप साहित्य प्रसिद्ध झाले आहे. मराठीमध्येसुद्धा बी कवि आणि ग्रेस कवि यांच्या कविता वाचण्यासारख्या नव्हे अनुभवण्यासारख्या आहेत. अरेच्या मी बडबडत बसलो आहे. सॉरी मॅडम खरं सांगू का ? एवढं मोकळं बोलण्याची आणि एवढ्या सुंदर जागेत बोलण्याची संधी कधीच मिळाली नाही.''

श्रीकांतच्या गबाळ्या पोषाखाबद्दल मी भानूला अगोदरच कल्पना दिली होती. तरी श्रीकांतला पाहताच तिनं नाक मुरडलंच. शिष्टाचार म्हणून ती माझ्याबरोबर स्टडीत आली होती. पण श्रीकांतचं बोलणं त्याचे विचार ती लक्ष्यपूर्वक ऐकत होती.

आम्ही घर पाहून हॉलमध्ये आलो.

आम्ही उभयता जरी संपूर्ण शाकाहारी असलो मद्यापासून चार हात लांब असलो तरी घरी येणारे सर्व पाहूणे आमच्यासारखे थोडेच असणार. म्हणून खाण्याची नाही तरी पिण्याची सोय मी केली होती. उत्तमोत्तम म्याचा संग्रह माझ्याकडे होता.

माझ्या मते श्रीकांत आमच्या कॅम्पमधले असावेत. तरीसुद्धा शिष्टाचार म्हणून मी त्यांच्याजवळ सहज पिण्याचा विषय काढला. पण घडलं वेगळंच इतकावेळ साहित्य, मानसशास्त्र या विषयांवर बोलणारे श्रीकांत माझा मद्यसंग्रह पाहण्यास आतूर झाले.

मी कपाट उघडताच जत्रेत हरवलेलं मूल जसं चोहीकडे भरकटतं तशी श्रीकांतची दृष्टी सगळीकडे फिरत होती.

माझे मित्र ड्रिंक घेतात. पण ड्रिंक हा जेवढा सौम्य आणि सभ्य शब्द आहे तेवढ्याच अदबीने नकदीने ते त्यांचा आस्वाद घेतात. एक तऱ्हेने ते मद्यपानाला योग्य तो न्याय देतात. पण श्रीकांत हा त्या बाबतीत धटींगण निघाला. मी त्याला तयारी करून दिली आणि हावरटासारखा तो ग्लास रिकामे करू लागला.

भानूचा जेवणाचा बेत मस्त होता. भरलीवांगी, फणसाची भाजी, टिकरीची कढी आणि उकडीचे मोदक. तो दिवस संकष्टीचा होता. आई गणेशभक्त होती. दर संकष्टीला आमच्याकडे उकडीचे मोदक नैवेद्याला असत. संकष्टीलाच आईनी जगाचा निरोप घेतला. तिची आठवण म्हणून दर संकष्टीला भानू उकडीचे मोदक करत असे. मद्यपानाचा कदाचित परिणाम असेल पण श्रीकांतनी मोदकांवर आडवा हात मारला. मला फार समाधान वाटलं. पाहूणा भरपूर जेवला म्हणजे आईला खूप आनंद होई. कारण माझे वडील आणि दस्तुरखुद्द जेवणात हार न मानणारे होतो. पण पाहूणाच आखडता हात घेऊन जेवू लागला तर आम्हाला अर्धपोटी पानावरून उठावं लागे.

जेवणं आटोपली आम्ही हॉलमध्ये परत आलो. आमच्या घरी सुपारी खाणारं कोणी नाही. पण लवंग, वेलदोडे पुढे आले. श्रीकांत शेंगदाण्यासारखे वेलदोडे दाताखाली रगडत होता. मी धुम्रपान करीत नाही पण पाहुणे येणार असतील तर स्टेट एक्सप्रेसची पाकीटं तयार

असतात. श्रीकांतनी पाकीटाचा ताबा घेतला. एकापाठोपाठ एक अश्या दोन सिगरेटस् सहज फुंकल्या. तिसरी सिगरेट पेटवताना पुन्हा मद्याची विनंती केली.

भानू हजर होती. हातवारे करून मद्य देऊ नका असा मला आग्रह करीत होती. पण माझ्या अंगात यजमान संचारला होता. मी श्रीकांतला तयारी करून दिली आणि मी तिथेच चुकलो.

संयमाची सारी बंधने तोडून श्रीकांत मद्याचे पेले पाण्यासारखे रिचवीत होते. भानूनी डोक्यावर हात मारून पुतळ्यासारखी उभी होती. शेवटी मी श्रीकांतच्या हाताता पेला हिसकावून घेतला आणि जवळ जवळ त्याला ढकलीत कोचावर बसवला. श्रीकांत मद्याच्या पूर्ण आहारी गेला होता.

हळूहळू पाय पसरवीत श्रीकांत बैठकीवर ओणवे होऊन चाचपडू लागले. कॅरम बोर्डवर खेळतात तसे टिचक्या मारू लागले. तोंडानी बडबडू लागले.

''सोन्या, खेळ बाबा खेळ. उद्या तूला आई आश्रमात नेणार. तिथं कोण खेळणार तुझ्या बरोबर ? मध्येच श्रीकांत रडत मध्येत रागवत. मध्येच त्यांच्या आईला उद्देशून बोलत 'आई, खरं सांग ना ? मी कोण आहे ? साने आहे का माने आहे कां कोणीच नाही. मी तुझा नाही आई. तू तू मला उकीरड्यातून उचलून आणलंस कशाला आणलंस ? मेलो असतो मी त्या घाणीत.''

श्रीकांत मद्याच्या धुंदीत पूर्वायुष्यात घुसले होते. मी त्यांचा एक नविनच अवतार पाहत होतो. श्रीकांतचा फोन नंबर माहीत नव्हता. पत्ता माहित नव्हता. मी डॉक्टरना फोन करणार होतो पण भानूनी स्पष्ट नकार दिला.

मध्यरात्र उलटून गेल्यावर श्रीकांत शांत झाले. मी त्यांना कसंबसं उचलून कोचावर ठेवलं. आमच्या झोपेचं खोबरं झालं होतं. मी उशी घेऊन बैठकीवरच लवंडलो.

सकाळी खूप उशीरा श्रीकांत उठले. भानावर आले. पण ते खूप थकले होते. त्यांच्या मते ते रात्रभर कोचावरच झोपले होते.

''गुड मॉर्निंग मि. श्रीकांत.''

''गुड मॉर्निंग मि. नारायण. बघीतलत गप्पा मारता मारता केव्हा झोप लागली ते कळळंच नाही.''

''मि. श्रीकांत तुम्ही खूप थकला आहात. फ्रेश व्हा. नास्ता करा. मी गाडी देतो तुम्ही घरी जा. आणि विश्रांती घ्या. ऑफिसची काळजी करू नका. सावकाश बरं वाटलं की या.''

''कोण ? मी थकलोय ? कां थकलोय ? मि. नारायण मी बडबडून तुम्हाला त्रास दिला कां ?''

''छे ! तुम्हीच नाही कां म्हणालात रात्रभर तुम्ही कोचावर झोपला होतात म्हणून.''

मला न जुमानता श्रीकांत गाडीत न बसता घरी गेले. त्यानंतर दोन दिवस त्यांचा पत्ताच नव्हता. तिसऱ्या दिवसाया वर्तमानपत्रात आलेल्या बातमीने आमचं ऑफीस ढवळून निघालं.

बातमीप्रमाणे हायकोर्टाचा निकाल आपल्या विरुद्ध गेला या धक्क्याने एका मध्यमवर्गीय माणसाने दुसऱ्या मजल्यावरून उडी घेऊन आत्महत्या केली. खिशातल्या कागदपत्रावरून या गृहस्थाचे नांव श्रीकांत साने असल्याचे समजते. खटला घटस्फोटीत दांपत्याचा होता. मुलाची कस्टडी मुलाच्या आईला मिळाली होती.

धडपड करून श्रीकांतची शेवटची व्यवस्था केली.

ऑफीसची कामं लवकर आटपून मी खूप लवकर घरी परतलो.

घरी पोस्टानी आलेल्लं एक पाकीट माझी वाट पहात होतं. मी पाकिट फोडलं.

'कुणाचं पत्र ?' भानू काळजीनेच विचारत होती.

पत्र श्रीकांतचं होतं. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी ते मला पाठवलं होतं.

''मि. नारायण. हे पत्र तुमच्या हातात पडेल त्यावेळी मी हे कृतघ्न जग सोडून गेलेलो असेल. आणि तो माझा अखेरचा पराभव असेल. कारण पुढचे पराभव झेलण्यासाठी माझं अस्तित्वच नसेल. कोर्टाचा निकाल काय लागणार हे मी पुरेपुर समजून चुकलो आहे.

मि. नारायण तुम्ही माझ्या आयुष्यात फार उशीरा आलात. हाही एक पराभवच नाही का ? तुमची माझी भेट या अगोदर झाली असती तर मी पराभवानी खचून गेलो नसतो. आपल्याच हातांनी आपल्या आयुष्याची ज्योत विझवून टाकण्याचा प्रसंग कदाचित टळला असता.

माझे सहकारी तोंडावर नसावे तरी आपसात कुजबुजतात. माझी स्तुती करतात. माझ्या मार्गदर्शनानी त्यांचे आयुष्य उजळून निघाल्याचे सांगतात. मि. नारायण मी दुसऱ्यांच्या आयुष्यात सुखाच्या रांगोळ्या काढल्या पण माझ्या घराचा उंबरठा रांगोळीशिवाय राहीला. मी एकदा दोनदा रांगोळी काढण्याचा प्रयत्न केला पण रांगोळी पुरी होण्याअगोदरच दुर्दैवानी ती साफ पुसून टाकली असे किती पराभव मी सहन करणार ?

आयुष्यात मी एकदाच जुगार खेळलो. लग्नाचा जुगार खेळलो. साफ हरलो आणि पांडवांच्या पंक्तीत जाऊन बसलो. पांडव जुगार खेळले आणि निरपराध द्रौपदीचं वस्त्रहरण झालं. मी जुगार खेळलो आणि माझं लज्जाहरण झालं.

मि. नारायण, माझं रुपडं बघून मी आडनांवानी 'साने' आहे याचं आश्चर्य नाही वाटलं ? नक्की वाटलं असणार. पण आपण मूर्तिमंत सौजन्य. कधीही हे आश्चर्य ही उत्सुकता दाखवली नाहीत. मी सुद्धा एकेकाळी असाच सज्जन होतो. आचारानी विचारांनी असाच सज्जन होतो. आणि खरं सांगू ? माझं मलाच माहिती नाही मी सान आहे कां माने आहे का आणखी कोणी आहे. हे आडनांव एका शापभ्रष्ट विधवेचं आहे. ऐन तारुण्यात वैधव्याचे निखारे पदरात घेऊन आयुष्यभर झगडत राहिलेली एक शिक्षीका.

एका भल्या पहाटे शाळेच्या कुठल्याश्या समासांची पूर्वतयारी करण्यासाठी निघालेली ही देवता कचऱ्याच्या कुंडीजवळून जाताना एका लहान जीवाच्या किंचाळण्यानी स्तब्ध झाली. आवाजाचा वेध घेत ती एका गाठोड्याजवळ आली. जुनेऱ्याच्या गाठोड्यातून ते आर्त स्वर येत होते. साने बाईनी गाठोडं उचललं उघडून पाहीलं. एक लालकाळा तहानलेला जीवन टाहो फोडीत होता.

आयुष्यात कधीही मातृत्व न उपभोगलेल्या सानेबाईंच्या हृदयातली सुप्त माता जागृत झाली. चटकन् गाठोडं पदराखाली लपवून सानेबाई आजूबाजूचा कानोसा घेत घरी परतल्या.

प्रत्येक घरांत मूल विशेषत: मुलगा जन्माला आला की सर्व नातेवाईकांसह घर आनंदाने ओथंबून जातं. नविन बाळ घेऊन येणाऱ्या मातेपुढे सुखाच्या, कौतुकाच्या पायघड्या पसरल्या जातात. मि. नारायण. माझा जन्म झाल्याबरोबर तिरस्कारांनी मला

कचरापेटीजवळ टाकून देण्यात आलं. सानेबाईंच्या कुशीत रडत रडत मी माझ्या छे सानेबाईंच्या घरात प्रवेश केला.

सानेबाईंना.. छे ! छे ! त्या देवतेला सानेबाई म्हणून मी दूर करणार नाही. यापुढे त्यांचा उल्लेख मी आई म्हणूनच करीन.

आईच्या संपर्काहून लांब राहणाऱ्या तिच्या नातेवाईकांनी व शेजाऱ्यांनी आईला भंडावून सोडलं.आईच्या खोलीवर व वाचलेल्या पैशावर डोळा ठेवणाऱ्या नातेवाईकांचे डोळे पांढरे होण्याची पाळी आली. पण रेशमाहून मऊ अंग असणारी आई वज्राहून कठोर झाली. माझं श्रीकांत असं नामकरण करून तिनं मला सर्वार्थानी आपलं करून टाकलं. असा मी श्रीकांत साने झालो, माझा खुलासा ऐकून मि. नारायण, आपण कितीही उदार असलात, सुधारक असलात तरी आपल्या विरोधाला न जुमानता कुठेतरी अंतरंगात रेंगाळणारा उच्च वर्ण निश्चितच म्हणेल 'चला. हा वेडावाकडा काळाकुट्ट माणूस कोकणस्थ असतो तर मला दुसऱ्याच्या बाबतीत असंच वाटलं असतं.

आईनी माझ्यासाठी काय केलं नाही ? न्हाऊ माखू घातलं. खाऊ पिऊ दिलं. आजारपणात जागरणं केली. उत्तम शिक्षण दिलं. सर्व काही दिलं. पण मला जन्म दिला नाही म्हणून रूप दिलं नाही. मला इतकं शिकवलं की जन्मानी नाही पण कर्मानी मला ब्राह्मण करून टाकलं.

मि. नारायण मला खरोखरच चांगलं आयुष्य जगायचं होतं. माझी झेप गरुडझेप होती. पंख मजबूत होते. आईनी दिलेलं सोन्यासारखं 'साने आडनांव होतं. पण उकीरड्याच्या घाणीनं माखलेलं माझं रुप माझे पंख कापून टाकीत. मि. नारायण रुपावर काय आहे ? रुप बघू नये ज्ञान बघावं कर्तृत्व बघावं असं म्हणणारे मला भेटले तसे तुमचं नांव साने ? म्हणत असा चेहरा करीत की मला माझ्या मानेवरून सुरी फिरविल्यासारखे होई.

लग्नाला शुभकार्य म्हणतात. एका जीव द्यायला निघालेल्या कुमारी मातेला मी मोठ्या शर्थीने वाचवलं. तिच्या उदरातल्या गर्भासह तिचा स्विकार केला. पण हे स्वप्न फार काळ टिकलं नाही. माझं वेडंवाकडं रुप पुन्हा माझ्या सुखाआड आल माझी पत्नी मला खुशालचेंडूच्या जाळ्यात अडकली. संसार मोडला. गळ्यात मुलाचं लोढणं नको म्हणून मुलाचा ताबा माझ्याकडेच होता. पण दैवाला तेही सुख पहावलं नाही. कोर्टात मी खटला हरणार घटस्फोट मिळणार आणि मुलाचा ताबा त्या बयेला मिळणार. बस्स आता यापुढे पराभव मला सहन होणार नाहीत.

मि. नारायण माझं पुराण बरच लांबलं. पण एका गोष्टीचा खुलासा जाता जाता करतो. सानेबाईंच्या कडक शिस्तीत वाढलेला, जन्मानी नसला तरी जन्मापासून एका ब्राह्मण घरांत वाढलेला हा गृहस्थ मांसाहार, अतिरिक्त मद्यपान याच्या आहारी गेला कसा या प्रश्नाचं उत्तर मला द्यावंच लागेल.

आईला मृत्यूनी अचानक गाठलं. एरव्ही अधून मधून फेऱ्या मारणारे नातेवाईकांचा पत्ता नव्हता. मी अंत्यसंस्कार करणार म्हटल्या नंतर तथाकथीत सुशिक्षित, सुसंस्कारीत शेजाऱ्यांनी नाकं मुरडली. 'हे काय भलतंच ? बाईंचे नातावाईक असताना हा कोण काळोबा अग्नी देणार ? अशी कुजबूज होत होती. शेवटी दोन चार जणांच्या मदतीने मी आईला अग्नी देऊन तिला मुक्त केली.

दुसऱ्या दिवशी नातेवाईक गोळा झाले. माझ्याकडे दत्तक पत्राची विचारणा झाली. वाद एवढ्या विकोपाला गेले की मी ट्रंकेत माझे कपडे भरले आणि माझ्या आईचं त्यांच्या सानेबाईंचं घर सोडलं. डोकं गरगर फिरत होतं. दोन दिवस उपाशी होतो. दु:खाच्या, विरहाच्या भरांत मी दारूचा पहिला पेला घेतला. आणि शेवटपर्यंत घेतच राहीलो.

मी गबाळा पोशाख का करतो ? ऐकायचं आहे ? ऐका. मी जुन्या कपड्यांच्या बाजारातून अगदी स्वस्त कपडे आणतो. अगदी कमी खर्च करतो. आणि उरलेले सर्व पैसे अनाथगृहाकडे पाठवतो. तिचे माझ्यासारखी नाकारलेली, ठोकरलेली उकीरड्यावरची पोरं आहेत. मला सानेबाई भेटल्या त्यांना कोण भेटणार ? कोण त्यांना जवळ करणार ? म्हणून ति स्वत: त्यांची सानेबाई होण्याचं ठरवलं. माझी झोळी लहान आहे, मळकी आहे, फाटकी आहे पण उरलेले चार दाणे तरी त्या अनाथ मुलांना मिळतात ना ?

मि. नारायण तुम्ही मला प्रेम दिलंत. विश्वास दिलात नविन कपडे देऊ केलेत. पंक्तीला बसवून भरपूर जेवू घातलंत. या पोरांचा कोण असा पाहुमचार करणार ?

माझ्या आयुष्याच्या शेवटच्या वळणावर मि. नारायण तुम्ही भेटलात. डॅडसाहेब भेटले. भानू मॅडम सारख्या धर्मभगिनी म्हणून मी भगिनी भेटल्या. पण फार उशिरा फार उशिरा. आमची पालखी स्मसानांत पोहचल्यावर वैद्यबुवा औषधांचा बटवा हलवीत आले. विसरून जा. मला खरंच विसरून जा. शेवटी शेणातला किडा शेणातच मरणार.

या कृतघ्न जगात परत कशाला यायचं ? नाही पण मला यावंच लागेल या अनाथ पोरांची सानेबाई बनून यावं लागेल.

भानूसाठी मी पत्र मोठ्या आवाजात वाचत होतो. डोळ्यातून अश्रुधारा वहात होत्या. श्रीकांत साने गेले पण त्यांच्या स्वप्नातून आम्हाला जागं होता येईना.

इतक्यात दारावरची बेल वाजली. पुन्हा वाजली. भानूनी इच्छा नसताना दरवाजा उघडला.

दारांत मि. लोबो श्रीकांतचे कपडे घेऊन उभा होता.

❑❑❑

## मानसन्मान

चि.पुनीत नंदकुमार खटावकर हा २००७-०८ या वर्षातील १०वी च्या परीक्षेत ८९ टक्के गुण मिळवून अुत्तीर्ण झाला. चि. पुनीत काशिनाथ दत्तात्रय मराठे (पृ.१९८) यांचा नातू आहे. त्यांची ज्येष्ठ कन्या अुज्वला नंदकुमार खटावकर यांचा पुनीत हा मुलगा आहे. स्थापत्य शास्त्रात पुढील पदार्पण करण्याची त्याची आकांक्षा ओ. वाचन, वेगवेगळ्या विषयांवरील माहिती व तंत्रज्ञानानुसार रूची घेऊन वाचन, चर्चा याद्वारे विकास साधण्यावर त्याचा भर आहे. समोर येणाऱ्या प्रत्येक विषयावर सखोलपणे व लक्षपूर्वक ज्ञानाचे तो आदान प्रदान करू शकतो. सार्वजनिक व पर्यावरणाविषयक अुपक्रमांमध्ये त्याचा सहभाग असतो.

गुणवान अशा या चि.पुनीत याचे मराठे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

# (स्व.)सौ. डॉ. शशिकला चिंतामणी मराठे



मराठे कुलवृत्तांत - घराणे २ पान ३५/४१.

| जन्म | मृत्यु |
|---|---|
| १२ जानेवारी १९४६ | २३ डिसेंबर २००८ |
| (पुणे) | (पुणे) |

सौ. शशिकला ह्या माधवराव डिंगणकर ह्या प्रसिद्ध केटरींग व्यवसायी (सुयोग कार्यालय) ह्याच्या द्वितीय कन्या होत्या. शिक्षण नविन मराठी शाळा, अहिल्यादेवी प्रशाला व स.प. महाविद्यालय ह्यात होऊन कायम प्रथम वर्ग मिळवत होत्या. त्याकारणे डॉ. भुपटकर ह्याच्या आग्रहामुळे डॉ. स.म. परळीकर ह्याच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी सन १९७४ मधे मिळवली. त्यासाठी त्याचा विषय ''हिंदी आणि मराठी कादंबरीतील स्त्रीदर्शन एक तुलनात्मक अभ्यास सन १८६० ते १९४० ह्या कालखंडातील'' हा अभ्यास त्यांनी डॉ. चिंतामणी मराठे १९६९ साली विवाहानंतर केला हे विशेष होय, व आपल्या वडलांची विशेष इच्छा म्हणून केला हे महत्त्वाचे होय व सर्व सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडत पुर्णत्वास नेला. आत्यंतिक गरज नसल्यामुळे त्यानी नोकरी वगैरे न करता एका गृहकृत्य गृहीणी म्हणून कालक्रमणा केली. त्यात दोन मुलींी शिक्षणे, मामंजींची देखभाल त्याच्या ९८ वर्षापर्यंत यथासांग केली. पतिच्या नोकरी कार्यात घराकडे लक्ष देणे शक्य नसल्यामुळे सर्व जबाबदाऱ्या उत्तम प्रकारे पेलल्या.

सन २००० पासून वेळ असल्यामुळे त्यानी त्याचे मार्गदर्शक डॉ. परळीकर यांच्या प्रोत्साहनामुळें अनुवादाचे कार्य आंगिकारले व त्यात पुर्णपणे आनंद मिळवला. त्यात (१) पुण्य सुधाशुं महाराज याचे विदुरनिती हिंदीतून मराठी (२) डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे यांचे भारतीय राष्ट्रवाद मराठीतून हिंदी (३) डॉ. द्वारकानाथ राणे यांचे जातक संहिता मराठीतून हिंदी. (४) स्वामी ब्रम्हानंद यांचे भिमरूपी स्त्रोत्रावरील २५० पृष्ठाचे भाष्य - हिंदीतून मराठी. (५) डॉ. अविनाश कुलकर्णी यांचे War Against Cancer इंग्रजी - मराठीतून हिंदीमधे (६) पुणे मार्गदर्शिका मराठीतून हिंदीमध्ये (७) गुरुवर्य मामासाहेब देशपांडे यांची १२ व १५ गीता अध्यायवरील प्रवचने - मराठीतून हिंदी मधे (८) बाईफ द्वारे व्यवस्थापन संबधी लेखाचे मराठीतून - हिंदीत भाषांतर (९) वाईफच्या समृद्धी ह्या चित्रफितीची मराठीतून हिंदीमधे पटकथा. (१०) केइएम् संशोधन संस्थेच्या काही शोध प्रकल्पाच्या माहितीपत्रकाचे मराठी/इंग्रजीतून हिंदी भाषांतर. (११) याशिवाय सन २००६ पासून शेवटपर्यंत गांधर्व महाविद्यालय संस्थेद्वारा प्रसारित संगित कला बिहार-मिरज ह्या मासिकाचे लेख मराठी-हिंदी व हिंदी - मराठी भाषांतरे अंदाजे ५००च्या पृष्टे.

हा भाषांतराचा प्रपंच गेल्या दशकात आवडीने केला. घरबसल्या आपल्या ज्ञानाचा उपयोग करून घेता आला.

ह्या व्यतिरिक्त खाली स्फूट लेखन केले येणे प्रमाणे -

(अ) महिला सक्षमीकरण स्पर्धा - कॉसमॉस बँक इत्यादी स्पर्धा तृतिय बक्षिस, स्त्रीची आर्थिक स्वायत्तता - प्रकाशन यशोधरा दिवाळी अंक २००५.

(ब) आमच्या घराण्याचा मानबिंदू - केटरिंगला वैभव देणारे माधवराव डिंगणकर - उत्तमकथा - जून २००८.

(क) 'हितगुज' डिसेंबर २००६ - तुज सगुण म्हणु की निर्गुण रे ?

(ड) गीताधर्म मंडळ - कोथरुडसाठी वेळोवेळी शब्द लेखन. त्यांचे एक कडवे - घोष वाक्य म्हणून सर्वानुमते मान्य - या प्रमाणे.

गीतेचा महिमा अपार। आत्मज्ञानाचे भांडार।

*करावा घरोघरी प्रसार। हाच एक निर्धार॥*

एक शांत निर्गवी, समंजस हवे हवे वाटणारे व्यक्तिमत्त्व सर्व कुटुंबास एकत्र बांधून ठेवणारे सुत्र अचानक काळाने सर्वापासून काही मिनटात दूरच्या प्रवासास गेले. अचंबा वाटावा असावा वियोग सर्वाचा निरोप न घेता व मराठेकुलाची मान उंचावता काळाच्या पडद्याआड गेला हे खरे. असो इश्वरेच्छा. मात्र जाण्यापूर्वी आपल्या नव्या नातवासाठी ''नवागतास आशिर्वाचन'' मात्र लिहून ठेवले होते. जाता जाता त्याला आशिर्वाद. त्यांना अहेवपणी मरण आले ही भाग्याची गोष्ट.

❑❑❑

*(पृ. ७ वरून)*

## प्रतिष्ठान वृत्त - कार्यकारी मंडळ

शुक्रवार दि. ६ फेब्रुवारीला दुपारी ४ वा. प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची बैठक अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, ठाणेयांच्या निवासस्थानी भरली. सर्व सदस्य अुपस्थित होते. पत्रव्यवहाराचे वाचन झाले. मराठ्यांची ज्येष्ठ माहेरवाशिण श्रीमती मुक्ता श्रीखंडे, पुणे यांनी प्रिया मराठेला व संपादिकेला लिहिलेल्या पत्रांचे वाचन झाले. कै. सुरेशभाऊ स्मृतीदिना निमित्त १४ मार्च ला होणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा निश्चित करण्यात आली. 'हितगुज'ला जाहिराती मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत हे सर्वानुमते ठरले. अुपाध्यक्षांनी केलेल्या आवाहनाला सर्वसंमती दिली. याच अंकात ते प्रकाशित केले आहे. कारवार कर्नाटक मधील अुलूपी येथे ३० एप्रिल १ मे व २ मे हे तीन दिवस अखिल भारतीय मराठे संमेलन होणार आहे. त्यात सहभागी होण्याचे व मराठे संमेलन यशस्वी करण्याचे निर्णय घेण्यात आले. अल्पोपहार व चहापान होऊन बैठक संपली. हितगुज मधील विविध स्पर्धांसाठी पारितोषिके देण्यासाठी सदस्यांनी बक्षिसनिधी म्हणून ठराविक रक्कम जमा केली. पुढील बैठक दि. १४ मार्चला ४ वाजता घेण्याचे ठरले.

# विकासकाचे अनोखे करिअर.....

**लेखक : श्री.अजितकुमार मराठे**

घर ही आपली मूलभूत गरज आहे. योग्य असा निवारा/घर हे प्रत्येकजणच शोधत असतो. घराशी आपली प्रचंड emotional attachment असते आणि माझं घर सुंदर असावे तसंच ते समाधान देणारं, शांती देणारं असावं ही प्रत्येकाची गरज आहे. त्याचबरोबर माझं घर हे dream home असावे, जो कोणी माझ्या घरी येईल त्यांनी या घराच्या, वास्तूच्या व माणसांच्या प्रेमात पडावे असे प्रत्येकालाच वाटत असतं.

मुलं व घर या दोन बाबतींत कोणीही व्यक्ती कधीच तडजोड करायला इच्छुक नसतो. आपल्यापैकी काही भाग्यवंत सोडले तर उरलेल्या सर्वांच्या आयुष्यात, नोकरीतच अर्धे आयुष्य घराचे हप्ते फेडण्यात जातं. त्यामुळे प्रचंड वेळ व पैसातर खर्च होतोच पण मानसिक ओढाताणही होते.

या सर्व पार्श्वभूमीवर चांगले तयार विकासक होण्याची आवश्यकता आहे व आपल्या मुलांनी विकासक या करिअरकडे गंभीरतेने व अधिक संख्येने बघण्याची आवश्यकता आहे.

विकासक होण्यासाठी कोणत्याही पदवीची/पदविकेची आवश्यकता नाहीही सर्वात महत्त्वाची गोष्ट. डी.एस.के. सारखा टेलिफोन साफ करणारा माणूस हा सर्वात चांगला, professional आणि दिशादर्शक विकासक होऊ शकतो. ते आज भारतातच नाही तर अमेरिकेतही स्वत:चे प्रकल्प विकसित करीत आहेत आणि सुरेश हावरेसारखा B.Tech. Gold Medalist, B.A.R.C. मधील वैज्ञानिक आज स्वत:च्या भावाने सुरू केलेल्या हावरे बिल्डर्सच्या घोडदौडीत भावाच्या पश्चात धुरा नुसतीच सांभाळत नाहीत तर व्यवसाय १०० पटींनी मोठा करीत आहेत.

१. विकासक होण्यासाठी व्यक्तीचा दृष्टिकोन तसा असायला हवा उदा. बऱ्याचदा शहरात मर्यादित जागेवर प्रकल्पाची गर्दी तर इतरत्र घरांची कमतरता दिसते. अशा वेळी नवीन प्रकल्प नवीन ठिकाणी सुरू करण्यासाठी तसा दृष्टिकोन (vision) असणे आवश्यक असते. प्रकल्प जेथे सुरू करायचा तिथे कसा प्रकल्प आखावा की जेणे करून सर्वांनाच फायदा होईल हे पाहणे आवश्यक ठरते.

२. विकासक Civil Engineer असल्यास उत्तम, पण नसेल तरी प्रत्यक्ष Site वरचा अनुभव, नवीन ठिकाणी प्रकल्प चालू करताना मोलाचा ठरतो. ज्यांना विकासकव्हायची इच्छा आहे त्यांनी असा अनुभव जरुर घ्यावा हे मी आमच्या अनुभवावरून आग्रहाने सांगतो.

३. विकासक होण्यासाठी multidimensional personality असणं अत्यंत आवश्यक आहे. एकाच वेळी बँकिंग, कायदेशीर बाबी, मार्केटिंगच्या policies, ग्राहकांशी नातेसंबंध, दगड माती, सीमेंट इ. सामान व त्याचा पुरवठा, कामाची सुयोग्य गती राखणं, दर्जा राखणं या रोजच्या बाबींबरोबरच बदलणारे जागतिक व्यापारी प्रवाह, बदलणारी सरकारी ध्येयधोरणे policies, बदलणाऱ्या गरजा व अपेक्षा या सर्वांचा सुयोग्य ताळमेळ राखावा लागतो.

त्यामुळे ज्यांच्याकडे एकाच वेळी अनेक क्षेत्रात/बाबीत लक्ष देण्याची देणगी आहे, त्या सर्व व्यक्ती हे करियर करण्यासाठी सुयोग्य आहेत.

४. वरील चर्चा केल्यास सर्व योग्यता एकदम एकाच वेळी व्यक्ती संपादू शकत नाही हे खरेच पण म्हणून एखाद्या छोट्या प्रकल्पापासून सुरुवात केल्यास, अनुभवातून शिकत पुढे जाता येईल.

५. सर्व प्रकल्पात पैशांची मोठ्या प्रमाणावर उलाढाल होते. त्यासाठी येणाऱ्या-जाणाऱ्या पैशाकडे पहाण्याची योग्य मानसिकता विकासकाला असावी लागते.

६. आज आपल्या देशाची प्रगती उत्तम गतीने आहे. अशा वेळी समाजाच्या प्रत्येक घटकाला, उत्तम निवारा मिळून त्याचे आयुष्य उत्तम दर्जाचे व्हावे ही इच्छा विकासकाची असावी.

७. ऊर्जा, पर्यावरण हे फक्त पर्यावरणवादी किंवा तत्सम गटाचे मुद्दे नव्हेत. या दोन्ही मुद्दांकडे अतिशय जिव्हाळ्याने विकासकाने बघावे. याचा फायदा आपल्या संपूर्ण विश्वाला होईल यात शंका नाही.

आज कोणतीही सामाजिक कामं उभी राहाण्यासाठी पैसा व कार्यकर्ते या दोन्हींची आवश्यकता आहे. यासाठी विकासकांनी आतापर्यंत केलेले योगदान खूप महत्त्वाचे आहे. अनेक बगीचे, रस्ते, मंदिर, शाळा, कॉलेज, हॉस्पिटल हे विकासकांच्या देणगीतून व प्रत्यक्ष सहभागातून उभे राहिले आहे.

आमचे ध्येय आहे २५ विकासक तयार करण्याचे. त्यासठी आमचे हात पुढे आहेत, ते हात धरायचे की नाही हा choice तुमचा आहे. या जगामध्ये तुम्ही काहीतरी सुंदर निर्मिती करणे ही तुम्ही जगाला दिलेली सर्वात सुंदर देणगी आहे. कारण निर्मिती ही शाश्वत असते, तुम्ही नाही. आजचा ताजमहाल आपण आनंदाने बघायला जातो आणि पिढ्यान् पिढ्या जात राहू. तसेच तुम्ही या जगात निर्माण केलेली सुंदर वास्तू हीच टिकेल. आज कुठल्याही देशात आपण गेलो की त्या देशातील सुंदर इमारती, रस्ते, बगीचे इ. बघून आपण देश किती प्रगत आहे हे ठरवितो.

आपला देश प्रगत करण्याची जबाबदारी आपली आहे. ती आपण या देशात सुंदर चांगली घरं, वास्तू, बगीचे निर्माण करून करूया. आज अशा भावनेनी काम करणाऱ्या विकासकांची देशाला व लोकांना गरज आहे.

**– अजित मराठे**

संपर्क - ९८२१२१५३९९

❑❑❑

## नांदासौख्यभरे

सौ. सीमा व श्री. रामचंद्रजी मराठे यांची सुकन्या चि. सौ. कां. श्रद्धा हिचा विवाह चि. महेश अशोक वाघधरे यांच्याबरोबर मंगळवार दि. ३० डिसेंबर २००८ला दुपारी १२ वाजून ५६ मिनीटांच्या शुभमुर्हूतावर सूर्यवंशी क्षत्रिय सभागृह, कॅडेलरोड, दादर, मुंबई येथे थाटामाटात संपन्न झाला.


वधूवरांना मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक शुभेच्छा व शुभाशिर्वाद.

**मानसन्मान**

# गुणवत्ता पारितोषिक प्राप्त विद्यार्थी

कु. प्रीता संजय करमरकर (पृ.५२०) हि एच.एस.सी. २००७-०८ मधे विज्ञानशाखेतून ८४.८३% गुण मिळवून अुत्तीर्ण झाली आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा तिला ३०० रु. आणि गणेश तांत्रिक पारितोषिक रु. ५०० चा पुरस्कार दिला गेला. 'हितगुज'चे पूर्व संपादक मा.श्री. लक्ष्मण शंकर यांची ही नात आहे. मराठे प्रतिष्ठान तर्फे कु. प्रीताचे अभिनंदन आणि पुढील शैक्षणिक कारकीर्दीसाठी शुभेच्छा.

*****



ज्येष्ठ जलतरणपटू (वय ८५) श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे यांनी स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे लक्ष्मणसिंग गौर स्मृतीप्रित्यर्थ ५वी जलतरण स्पर्धा इंदुर येथे आयोजित केली होती. त्यामधे ५० मीटर - फ्रीस्टाईल व ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक या दोन प्रकारात ५० मीटर अंतर हे अनुक्रमे १ मिनिट व ६.७२ सेकंद आणि १ मिनीट व ३४.२२ सेकंदात पार करून २ सुवर्णपदके पटकावली. नियमित सराव व जिद्द ह्यामुळे त्यांना हे यश सतत मिळते. मराठे परिवाराला अभिमान वाटावा अशी ही गोष्ट आहे. आणि म्हणून मराठे प्रतिष्ठान तर्फे रु.५००चा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. म.प्र. तर्फे हार्दिक अभिनंदन !

*****

कु. उमेश मनोहर मराठे याने मार्च २००८ च्या अेस.अेस.सी. परीक्षेत ८२.९२% गुण मिळविले. अुमेश हा खुडीपाट, (ता. देवगड) येथे राहात असून त्याच्या शाळेचे नाव श्रीभगवती माध्यमिक विद्यालय आहे. वर्षापूर्वी त्यांचे वडिल अचानक हार्टअटॅकने गेले. आई घरातली कामे करणारी गृहिणी आहे. त्याला दोन भावंडेही आहेत. आर्थिक परिस्थिती गंभीर आहे. त्याच्या गावातून दिवसाला अेकच बस शाळेपर्यंत जाते ती ही अेकुलती अेक बस रद्द होते किंवा बिघडते त्यावेळी शाळा ते घर चालत जाताना नाकी नऊ येतात. परंतु अशा सर्व प्रतिकूल परिस्थितीत, कु. अुमेश मनोहर मराठे याने जिद्द व संघर्ष करीत अत्यंत कष्टाचे व जिकीरीचे, खडतर दिवसांतून मार्ग काढीत अेवढे भरघोस यश मिळविले हे सुखवस्तू, अभ्यासातील सर्व सुविधा - क्लासेस असलेल्या लाडाकोडात वाढलेल्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशापेक्षा निश्चितच आगळेवेगळे, मोठे, अभिमानास्पद, गौरवास्पद असे यश आहे.

मराठे प्रतिष्ठान तर्फे त्याला २५०रु. व हिंदीत जास्तीत जास्त गुण मिळविल्याने रु.१०० बक्षिस स्वरुपात मिळाले आहेत. कु. अुमेश हा आशावादी आहे आणि देव त्याच्या पाठीशी आहे तेव्हा त्याचे भवितव्य अुज्वल असणारच हे सांगायला कोणा ज्योतिषाची जरूरी नाही. कु. अुमेशचे हार्दिक अभिनंदन.

*****

कु. अनुज रविंद्र मराठे याला दहावीच्या परीक्षेत ८३.६९% गुण मिळाले. मराठे प्रतिष्ठान तर्फे त्याला २५० रुपयांचे बक्षिस मिळाले आहे. कु. अनुजचे हार्दिक अभिनंदन.

कु. अदिती श्रीपाद मराठे (पृष्ठ क्र.८७) हिने वर्ष २००७-०८ मधे वाणिज्य शाखेच्या तिसऱ्या वर्षी ६८.४३% गुण मिळवून प्रथम श्रेणी संपादन केली. म.प्र. तर्फे २५०रु. बक्षिस तिला मिळाले. म.प्र. तर्फे कु. अदितीचे हार्दिक अभिनंदन.

******

कुमार तेजस चंद्रशेखर मराठे (पृ.२४८), पनवेल यास एस.एस.सी. परीक्षेत (१०वीत) ८६.७६% गुण प्राप्त झाले. डॉ. चंद्रशेखर मराठे यांचा मुलगा आणि 'हितगुज' मधे लिहिणारे श्री. चिंतामण मराठे यांचा तेजस हा नातू आहे.

म.प्र. तर्फे कु. तेजसला ३०० रु. आणि कु. अनिता खांबेटे स्मरणार्थ २५०रु. असे अेकूण ५५० रु. बक्षिस मिळाले. म.प्र. तर्फे अभिनंदन आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा !

****



कु. योगिनी काशिनाथ मराठे, दादर हिने ७वीच्या स्कॉलरशिप परीक्षेत ३०० पैकी २१५ गुण मिळवून अुत्तम यश संपादन केले. म.प्र. तर्फे १५० रु.चे कु. अनिता खांबेटे स्मरणार्थ २५०रु. मिळून ४०० रुपयांचे बक्षिस कु. योगिनीला मिळाले. आनंदाची गोष्ट म्हणजे ती पारितोषिक वितरण समारंभाला अुपस्थित राहिली होती. तिने, ''माझ्या आई-वडिलांचे, गुरुजनांचे व नातेवाईकांचे आशीर्वाद यामुळेच मला हे यश मिळविता आले'' असे सांगितले. म.प्र. तर्फे कु. योगिनी हिचे अभिनंदन आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा.

कुमारी माधवी अनिल मराठे, बदलापूर हिला २००७-०८ या वर्षी इ. १२वी कॉमर्सच्या फेब्रुवारी २००८ मधे झालेल्या परीक्षेत ७२.१७% गुण मिळाले आहेत. तिला म.प्र. तर्फे ३०० रुपयाचे बक्षिस मिळाले आहे. म.प्र. तर्फे कु. माधवी हिचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा !

*****

कुमार अमेय राजेंद्र मराठे, पुणे ह्याला एस.एस.सी. परीक्षेत (१०वीत) ८३.६९% टक्के गुण मिळाले. म.प्र. तर्फे कु. अमेयला २५०रु. बक्षिस मिळाले. कुमार अमेयचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा.

*****

# श्री.मोहनराव मराठे, बडोदे यांना बेस्ट परफॉर्मन्स अवार्ड



डावीकडून - श्री.अरविंद शर्मा (सेल्स ऑफिसर, बडोदा), श्री.मोहन मराठे, श्री.गणेश (वाईस प्रेसिडेंट - नेस्ले इंडिया लि.), श्री.केरकर सलील (ब्रांच सेल्स मॅनेजर) व श्री.त्रिवेदी अभय (एरिया सेल्स मॅनेजर, गुजरात)

बडोदे येथील आपले कुलबांधव श्री.मोहनराव मराठे हे १९६८ सालापासून नेसले इंडिया लि. चे वितरक असून १९८७ साली बेस्ट परफॉर्मन्स अवार्ड व १९९४ साली अेक करोड टर्नओवर अवार्ड त्यांना मिळला. तसेच १६ ऑक्टोबर २००८ला चाळीस वर्षांचे ‘असोसिएशन’ म्हणून सर्टिफिकेट मिळाले. श्री.मोहनराव यांनी महिन्याला रू.१५०००/- च्या टर्नओवरने सुरुवात केली आणि आज महिन्याचा १८ लाख टर्नओवर त्यांच्याकडे आहे. अशी विक्रमी प्रगती त्यांनी केल्यामुळे हॉटेल गेट-वे (जुने ताज रेसिडेन्सी) मध्ये त्यांचे पुष्पहाराने स्वागत केले आणि कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट श्री.गणेश यांनी त्यांना सर्टीफिकेट देऊन त्यांचा गौरव केला. मराठे प्रतिष्ठानतर्फे श्री.मोहनराव यांचे हार्दिक अभिनंदन. अशीच विक्रमी घोडदौड त्यांची चालू राहावी व भव्य यश मिळवे, या शुभेच्छा !

---

मानसन्मान

## गुणवत्ता पारितोषिक प्राप्त विद्यार्थी



कुमारी सोनाली सुरेश मराठे, ठाणे हिला एच.एस.सी. १२वी. कॉमर्स परीक्षेत ७६% गुण मिळाले. तिला म.प्र. तर्फे ३०० रु. बक्षिस मिळाले आहे. कु. सोनालीचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा. (कु. सोनालीचे वडील श्री. सुरेश मराठे हे ठाण्यातील ‘हितगुज’चे अंक कुलबांधवाच्या घरी समक्ष नेऊन देण्याचे काम आवडीने करीत असतात.) त्यामुळे ‘हितगुज’ अंक लौकर मिळतो.

श्री. राहुल सुरेश मराठे (पृ.२८०) यांना पीएचडी पदवी प्राप्त

दि. १९ जानेवारी २००९ ला, जवाहरलाल नेहरु विद्यापीठाची (नवी दिल्ली) पीएचडी पदवी श्री. राहुल सुरेश मराठे यांना मिळाली. त्यांच्या प्रबंधाचा विषय A Study of Fluctuations and Transport in Non-Equilibrium Systems असा होता. बंगलोरच्या रामन रीसर्च इंस्टिट्यूट मधे त्यांनी डॉक्टरेटचा अभ्यास केला.

डॉ. श्री. राहुल सुरेश मराठे यांचे म.प्र. तर्फे हार्दिक अभिनंदन. (सौ. नीलांबरीताईचे ते पुतणे आहेत)

❑❑❑

### चुकीची दुरुस्ती

‘हितगुज’ डिसेंबर २००८च्या अंकात ‘मानसन्मान’ मधे जलतरण स्पर्धेत, दत्तात्रेय आत्माराम मराठे विजयी या वृत्तात दि. २०-२१ ऑक्टोबर २००७ ला इंदुर येथे पाचवी जलतरण स्पर्धा आयोजित केली होती. असे त्यांचे सुपुत्र चि. अुदय मराठे दि. २५.९.२००८ लिहिलेल्या पत्रात कळविले होते पण ते चुकीचे असून ही स्पर्धा दि. २०-२१ सप्टेंबर २००८ला पार पडली असल्याचे श्री. दत्तात्रेय आत्माराम (पृ. यांनी कळविले आहे. चुकीबद्दल क्षमस्व !

***- संपादिका***

# अुपाध्यक्षांचे आवाहन

हितगुज हे आपल्या मराठे परिवाराचे मुखपत्र. दिवसेंदिवस एक दर्जेदार प्रकाशन म्हणून हितगुज नावारुपास येत आहे.

सभासदांनी सुमारे १८ वर्षापूर्वी दिलेल्या २०० रु. आजीवन वर्गणीचे व्याज, जाहिरातदार व सभासदांकडून वारंवार मिळणाऱ्या देणग्यांच्या बळावर आम्हाला सभासदांपर्यंत 'हितगुज' पोचवता आले.

महिलावर्ग, युवक व बालकांना हितगुजकडे व त्या माध्यमातून आपल्या प्रतिष्ठानाकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने त्यांना आवडतील अशी नवीन सदरे व स्पर्धा इ. हितगुजच्या पुढील अंकात समाविष्ट करण्याचा आमचा विचार आहे. त्यासाठी हितगुजचे अंक कमीतकमी २४ पानांचे असणे आवश्यक आहे. परंतू दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या छपाई व टपाल खर्चामुळे हात आखडते घ्यावे लागत आहेत.

मागील अंकात अध्यक्षांनी केलेल्या आवाहनास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सद्यपरिस्थितीचा आढावा सभासदांपुढे ठेवून परत एकदा हे आवाहन करीत आहोत.

**एप्रिल २००७ ते मार्च २००८च्या तालेबंदाप्रमाणे**

| | |
|---|---|
| **हितगुज निधी** | रु. २,९९,६८५ |
| **त्यावर मिळणारे वार्षिक व्याज** | रु.२२,४७६ |
| **४ अंकासाठीचा छपाई व वितरण खर्च** | रु. ५२,१५७ |

वार्षिकव्याज व खर्च यामधील सुमारे रु.३०,००० ची तफावत आपण जाहिरातदार व सभासदांकडून मिळणाऱ्या देणग्यांवर भागवत आहोत. पण हे असे किती दिवस चालणार? हितगुजला तातडीची गरज आहे आणखी कमीतकमी रु.५,००,००० निधी, ज्याच्या व्याजातून आपणास आपले हितगुज स्वावलंबी करता येईल. मराठे परिवाराच्या अगदी ५०% सभासदांनी मनावर घेतले व साधारण रु. १००० ची देणगी हितगुज निधीसाठी दिली तर हे सहज शक्य होईल.

आपले हितगुज दिमाखात चालू ठेवण्यासाठी हे जरूर आहे.

हे जर शक्य झाले नाही तर वाढत्या खर्चाला तोंड देण्यासाठी हळूहळू हितगुजची पाने कमी करत जाणे किंवा अंकांची संख्या कमी करत जाणे हेच पर्याय राहतील.

आपल्या हितगुजवर अशी पाळी येऊ नये म्हणून हे पुनश्च आवाहन.

**- श्री. रमाकांत विद्वांस (पृ.६२३)**
उपाध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

महिलावर्ग, युवक व बालमित्रांच्यासाठी आम्ही हितगुजमधे खालील नवीन सदरे चालू करण्याचे ठरविले आहे.

१. चतुरा - रोजच्या व्यवहारात उपयोगी पडतील वा वापरता येतील अशा नवीन कल्पना व युक्त्या.

२. आयुष्यातील घडलेले विनोद वा झालेली फजीती

३. दर्जेदार विनोद (इतरत्र प्रसिद्ध न झालेले)

४. चित्रकला स्पर्धा. (वय वर्षे ९च्या खालील बालकांसाठी)

सभासदांच्या कडून आलेल्या बक्षिसांसाठी रकमांपैकी प्रत्येक सदरातील सर्वोत्कृष्ट रु.१५० चे बक्षीस दिले जाईल.

चित्रकलास्पर्धेचा यावेळचा विषय गुढीपाडवा आणि रामनवमी.

चित्रकला स्पर्धेची अंतिम दिनांक २५ एप्रिल. मान्यवर परीक्षक निर्णय देतील. तो जूनच्या अंकात प्रकाशित होईल. स्पर्धेसाठीची चित्रे - संपादिका 'हितगुज'च्या पत्त्यावर पाठवावीत. विजेत्यास बक्षिस रोख रक्कम घरपोच पाठविली जाईल.

❑❑❑

# मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री.मोहन सदाशिव मराठे यांचा सत्कार



डावीकडून - श्री.प्रभाकर वैद्य, श्री.मोहन मराठे, श्री. श्याम करमरकर

खार येथे महाराष्ट्र मित्र मंडळ ही संस्था खार बांद्रा सांताक्रझ पार्ले भागातील मराठी माणसांसाठी संस्था २५ वर्षे सांस्कृतिक कार्य करीत असून तिचे १५००चे वर सभासद आहेत. संस्थेच्या २८-१२-२००८ रोजी २६व्या वार्षिक कार्यक्रमात मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री.मोहन सदाशिव मराठे ह्यांचा त्यांच्या 'साखर संघातील माझी वाटचाल' ह्या पुस्तकाबद्दल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रभाकर वैद्य व कार्यवाह श्री. शाम करमरकर ह्यांनी श्री.मराठेंच्या गौरवपर भाषणे केली. श्री.मोहन मराठे ह्यांनी त्याला समयोचित उत्तर दिले. ह्या प्रसंगी माधवी सिधये, राधा पेठे, मानसी जोग दत्तात्रय जोशी ह्यांचे सुश्राव्य गायन झाले.

मराठे प्रतिष्ठानतर्फे श्री.मोहनराव यांचे हार्दिक अभिनंदन !

❑❑❑

# The 'BEST' years

## ON THE EVE OF WORLD DAY, VRUNDA MOGHE DEV SPEAKS TO SENIOR CITIZEN

**- G B MARATHE** (पृ.४२७)

Who could think of doing a one-man talk show on BEST (Brihanmumbai Electgric Supply and Transport Undertaing), since it reminds us only of the jam-packed vehicles that run along the city's roads? But for G.B. Marathe A Ghatkopar resident, who has worked for the company for 38 years, BEST is not only an inseparable part of his life, but also the best part of is life. Thus, after having retired from service, Marathe penned a two-hour segment, relating anecdotes of BEST and enthralling the public.

He has performed the show ore than 350 times in Mumabi, Pune, Nagpur, Nasik, Surat and Nabvsari. He also had the chance to perform at the prestigious Vasant, Vyakhyanmala, Nasik, which is a meeting ground for stalwarts of Marathi literature.

Marathe says, "BEST has given me naukri, nari and nivara - service, sweetheart and shelter." He met his life's companion in a bus queue and his present house in in the BEST colony. Having begun is career as a clerk in the audit department in 1952, he steadily climbed the career ladder. He points out that great cine personalities like comedian Johnny Walker, Sunil Dutt and Hasrat Jaipuri, all began their life's journey in BEST. While Johnny Walker and Jaipuri were conductors, Dutt was a clerk. Prashant Damle, Arun Nalawade, current Marathi screen personalities too, were working in BEST. Marathe recalls how the eminent Marathi litterature S.N. Pendse joined BEST as a clerk. He had admitted that writing was not enough to keep the home fires burning and tht he needed a steady income. In 1963, when Pendse n the Rockefeller Fellowship, the then general manager of the organisation, said that it was a shame that a writer of such international recognition was only a clerk in the company. He was subsequently eleated to a class I officer.

Marathe related several stories regarding how BEST has had to deal with various kinds of people, since it was a public service. From prople who try to shed their guilty by sending donations to the company because they travelled ticketless, to people who claim compensation for damage to clothes, the BEST has had to face many such instances over the years. Even within the organisation, it has been a learning experience for Marathe. He narrates how one of the Parsi employees had nominated his dog as the heir to his provident fund and how it caused legal problems.Finally, the solicitor had asked for a trust to be formed, to comply with the employee's wishes. There was another tricky situation when unmarried female employee asked for maternity leave. Many such legal complexities were solved by referring to British and Indian legal precedents. Interesting episodes about the lost and found department of the BEST also find place in his show. The company is supposed to keep the lost goods for six months till claimants come and thereafter sell them. However perishables like eatables could not be preserved so long and hance such goods were given to the canteen. Once, a madari had left a snake in the bus. The reptile had to be kept in the Byculla zoo as 'lost property'.

Whle in service, Marathe was actively involved in writing for the in-house magazine and also a member of the literary circle. After his regtirement in 1989, he worked as a consultant to BEST for a while. Now, his writing has taken an upward swing, as he writes for various Marathi newspapers and periodicals. He is also an active partiicpant in civic activities especially those in Ghatkopar.

Marathe says that even after nearly two decades of his retirement, he still keeps in touch with BEST. Ask him what he feel about the bus services then and now, and he smiles back saying that BEST is the best.

(शनिवार दि. २७.९च्या टाईम्स ऑफ इंडियाच्या घाटकोपर - चेंबूर पुरवणीवरून साभार)

**श्री.ग.भा. मराठे (पृ.४२७)**

❑❑❑

# जिद्दी कर्तृत्त्वाची अखेर

पंधरा एप्रिल १९१९ला जन्म झाला. माझ्या सासूबाईंचा १९ही संख्या त्यांच्या जीवनात महत्त्वाची असावी. कारण १९१९ म्हणजे सालामध्ये दोनदा १९१९ आणि १५ एप्रिल म्हणजे १५+४=१९ तीन एकोणवीसांनी त्यांच्या जीवनाची सुरवात झाली आणि अखेरही १९लाच झाली. १९ ह्या संख्येचे त्यांच्या जीवनात अगम्य स्थान असावे (मृत्यु १९-१०-२००८)

हनुमान जयंतीच्या सुमुहूर्तावर त्यांचा जन्म झाला. हनुमानाने फळ आणण्याच्या जिद्दीने घेतलेली झेप त्याच्या जीवनाची सुरवात होती. तशी एक जिद्दी मुलीने सतत जीवनाशी झगडण्यासाठी घेतलेल्या झेपेचा तो प्रारंभ होता. हनुमान निस्सीम रामभक्त आईंचीही रामावर अपार श्रद्धा होती. तो रामराया सर्व काही ही त्यांची भावना होती. तुळशीबागेत सतत वास्तव्य असल्यामुळे रामाच्या सानिध्यात त्यांची बरीच वर्षे गेली. त्यांच्या जीवनाचे सुखद दुःखद प्रसंग त्यांनी रामाच्या संगतीत अनुभवले. त्या काळी मुलींच्या शिक्षणाला फारसे महत्त्व नसणाऱ्या काळात चार मुलांची आई असणाऱ्या आई मॅट्रीक झाल्या. हीच त्यांच्या कर्तृत्वाची पहिली ओळख. त्या काळात त्यांना त्यासाठी किती झगडावे लागले असेल ह्याची कल्पना आजच्या काळात येऊ शकणार नाही.

मॅट्रीक झाल्यानंतर नोकरी (पी.डब्ल्यू.डी.) आणि उत्तम रीतीने संसाराच्या हाकलेला गाडा हे सर्व खरंतर अवघड होते. पण ते त्यांनी कर्तृत्त्वबळावर साध्य करून दाखविले. मराठ्यांच्या घरात आलेल्या सुनांच्या जीवनात लग्नानंतर शिक्षणाचा योग असावा लग्नापूर्वी मी नुकतीच बी.ए. झाले होते. आईंच्या प्रोत्साहनाने मी एम्.ए. केले. एम्.ए. केलेस तरी नोकरी करू नकोस असे त्यांचे म्हणणे असावयाचे. माझ्या सुनेला नोकरी करावयास लागू नये ही त्यांची पहिल्यापासूनची भावना होती. जगातल्या अनुभवांची झळ तुला नको असे त्या नेहमी म्हणावयाच्या. आता माझी सन गायत्री हीने अमेरिकेत 'मेडिकल साईन्स'ची परीक्षा दिली म्हणून मला वाटते लग्नानंतर काहीतरी शिकणे ही आमच्या घरातील परंपरा असावी.

मी जेव्हा एम्.ए. झाले तेव्हा एक मोत्यांचा सर आईंनी मला बक्षीस दिला होता. मला तो फार आवडायचा. आजही माझा तो अत्यंत आवडता हार आहे. एका दोऱ्यात गुंफलेला तो सर. सर्वांना एकत्रीत गुंफण्याचे प्रतीक आहे असे मला वाटते.सर्वांनी एकत्रित असावे ही त्यांची भावना त्यातून व्यक्त होते. आता मी तो हार माझ्या सुनेकडे सुपूर्त केला आहे. तिने त्याची जपणूक करावी एवढीच इच्छा आहे.

कणखर वृत्ती आणि संकटाला तोंड देण्याची सदैव तयारी यामुळेच जीवनात कोणत्याही प्रसंगाला आईंनी तोंड दिले असावे. कोणतीही गोष्ट करता येत नाही हे त्यांना कधीच पटत नव्हते. प्रत्येक गोष्ट प्रयत्न केला की येणारच ही त्यांची शिकवण असायची आणि त्याप्रमाणे त्या वागायच्या देखील आणि करून दाखवायच्या देखील.

नातवंडांवर त्यांचे अपार प्रेम होते. पणतू पणती खापर पणतू सर्वकाही त्यांनी पाहिले. त्यांची लग्न पाहिली. सुखी संसार पाहिले. पण जीवन हे कधीतरी कुठेतरी थांबत असतेच. प्रत्येकाच्या जीवनाला शेवटाचे एक टोक जोडलेले असतेच. उत्पत्ती, स्थिती आणि लय माणसांच्या जीवनाची तीन पर्वे आहेत. प्रत्येकाच्या जीवनात हे घडून येणारच. त्यामुळे आई आता आठवणींच्या रूपाने आपल्यात राहणार आहेत. दिसामागूनी दिस चालतच राहणार आहेत. आठवणी तेवढ्या मागे राहणार आहेत.

*दिस येती आणि जाती*
*ऋतुचक्र हे फिरतची राही*
*आठवणींचा सुरेख धागा*
*अजोड वस्त्र विणूनी जाई*

अशा माझ्या सासूबाई श्रीमती मनोरमा गोपाळ मराठे यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली !

**सौ.उर्मिला श्रीनिवास मराठे, (पृ.३८९)**
३६/९ पाटबंधारे सोसायटी,
त्रिवेणी नं.१/६, एरंडवणे,
पुणे-४११०३८
फोन नं.२५४६४७०६

❑❑❑

## श्रद्धांजली

आपले कुलबांधव श्री. माधव अनंत खांबेटे, (सायन, मुंबई) यांचे वडील कै. श्री. अनंत धोंडो खांबेटे यांचे आषाढ शुक्ल प्रतिपदा १९३० म्हणजे दि.३ जुलै २००८ ला दुःखद निधन झाले तसेच त्यांच्या मातोश्री कै. श्री. मालिनी अनंत खांबेटे यांचे माघ शुक्ल प्रतिपदा - १९३० म्हणजे दि. २६ जानेवारी २००९ला दुःखद निधन झाले. श्री. माधव खांबेटे यांचे मातृछत्र आणि पितृछत्र हरपले परमेश्वर त्यांना ही दोन्ही दुःखे सोसण्याचे बळ देवो. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. माधव अनंत खांबेटे यांच्या माता-पित्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

कै.सौ.डॉ. शशिकला चिंतामणी मराठे (घराणे २ पान ३५/४१) पुणे यांचे २३ डिसेंबर २००८ ला दुःखद निधन झाले. मराठे प्रतिष्ठान तर्फे कै.सौ.डॉ. शशिकला मराठे यांना हार्दिक श्रद्धांजली. याच अंकात त्यांचे पति डॉ. श्री. चिंतामणी मराठे यांचा लेख प्रकाशित करीत आहोत.

## वसंत मराठे यांचे निधन

मराठे परिवाराचे सदस्य आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक वसंत मराठे (८१) यांचे नुकतेच प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे आणि एक कन्या आहे. भाजपचे माजी आमदार माधव मराठे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

संघाचे मुंबई महानगर कार्यवाह म्हणून मराठे यांनी दीर्घ काळ काम केले. त्यानंतर ते भाग संचालकही होते. संघ आणि संबंधित संस्थांमध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी त्यांनी सांभाळली होती. आणीबाणीत त्यांनी १७ महिने तुरुंगवास भोगला होता. मालाडच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे अनेक वर्षे अध्यक्षही होते. मराठे प्रतिष्ठान द्वारा श्रद्धांजली

# वाचकांचा पत्रव्यवहार

**पुणे - २६ डिसेंबर २००८**

श्री. सुधीरभाऊ मराठे यांना सप्रेम नमस्कार-

आपल्या 'मराठे प्रतिष्ठान'च्या विद्यमाने काल रोजी २९वा वर्धापनदिन व पुणे शाखेतर्फे काढण्यात आलेल्या २००९च्या डायरीचा प्रकाशन समारंभ असा एकत्र 'आनंद मेळावा' साजरा झाला व त्याला मला व आमच्या सौ.ना उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले त्यामुळे आमच्यासाठी तो 'आनंद-दिन' ठरला, यात किंचितही अतिशयोक्ती वा औपचारिकपणा नाही.

आपल्याकडून या कार्यक्रमाच्या सहभागासाठी जे निमंत्रण आले, तेव्हापासूनच त्या समारंभाबद्दलचे औत्सुक्य वाटत राहिले. प्रथमच हे नोदंवावेसे वाटते की, एखाद्या कुणाच्या किंवा परिवाराच्या कडून अशाप्रकारे गॅदरिंग अथवा गेट-टुगेदर प्रतिवर्षी आयोजण्यात येते व यशस्वीपणे पार पाडण्यात येते हा अनुभव आमच्यासाठी अनोखा होता. हल्ली सर्वसाधारणपणे कुटुंबातदेखील एकत्र येणे दुर्मीळ होत चालले आहे. अशा (प्रतिकूल) परिस्थितीत विशिष्ट आडनाव बंधू - भगीनींनी १३५ एवढ्या बहुसंख्येने आपलेपणाने जवळीक साधावी व ती उत्साहाने साजरी करावी, हे आपणासर्वांसाठी अभिनंदनीय आहे.

घरचा साधा समारंभ असला तरी कोण व्याप व ताप होतो ! तेव्हा समस्त मराठे कुलोत्पन्नांच्या वतीने प्रतिवर्षी होणाऱ्या या कार्यक्रमासाठी कार्यकर्त्यांना किती परिश्रम घ्यावे लागावेत याला सीमा नाही. आपण स्वत: व श्रीनिवास मराठे एवढ्या दोनच कार्यकर्त्यांशी माझा संबंध आला, त्यावरून कष्टाच्या हिमनगाचा वरचा तुकडा मला पाहता आला व त्यामुळे खाली कितीजणांचा हातभार लागला याचीही कल्पना आहे.

समारंभाचे स्वरुपही योजनाबद्ध व आटोपशीर होते. 'गणेश वंदना' या नृत्याच्या कार्यक्रमाने सुरवात झाली व उत्तरोत्तर जो सुरेख सूर लागला त्याने सर्वजण सुखावले. डायरीबद्दलचे निवेदन उत्कृष्ट झाले. त्यांची ओघवती वाणी ऐकून व्यक्तिश: मी घाबरलो. 'अब तेरा क्या होगा कृज ?' असा मला संभ्रम पडला. त्याला जोडून झालेला गौरव समारंभ व डायरी प्रकाशन यात फार वेळ न घालवता लगेच माझ्या मुलाखतीला सुरवात झाली. मला हे नमूद करण्यात आनंद वाटतो की, श्रीनिवास मराठे यांनी, मी त्यांच्याकडे जे 'साहित्य' पाठविले त्याचा सांगोपांग अभ्यास करून अतिशय मार्मीक प्रश्न विचारले. त्यात (प्रश्न निवडण्यांत) आपलाही सहभाग होता. त्यांनी ज्या सहजतेने प्रश्न विचारले. त्यामुळे माझी भीड चेपली व त्यांच्या गुगुली गोलंदाजीला चौफेर फलंदाजी करणे मला जमले. मुलाखत बरी झाल्याचा अभिप्राय अनेकांकडून मिळाला व त्यामुळे माझ्या सत्तर किलोच्या वजनात काही ग्रॅमची निश्चितच भर पडली. श्रीनिवास मराठे यांना माझा सलाम !

त्यानंतर अद्वैत मराठेचे गायन, त्याची गाण्यांची निवड, पेटीची सुरेल साथ, तबल्याचा सुयोग्य ठेका आणि अनुरूप निवेदन यांनी त्याने रसिकांची मने जिंकली.

त्यानंतरच्या मिलिंदजींच्या मुलाखती बद्दल काय लिहावे ? अप्रतिम ! पण वेळेच्या मर्यादेमुळे त्यांच्या भाषणाला व त्यांतून मिळणाऱ्या माहितीपूर्ण आनंदाला मर्यादा पडल्या. व 'गोडी अपूर्णतेची ती वेड लावी जीवा' असे मनोमन वाटले.

नाश्ता अप्रतिम होता. सुखद आनंदात अधीक गोडी निर्माण झाली.

असो. 'अनुभव' ताजातवाना असतांनाच लगेच प्रतिक्रिया व्यक्त करावी असे वाटले. त्यामुळे पुणे सोडण्या आधीच चार ओळी लिहून ठेवल्या आहेत. आपणा सर्वांचे अभिनंदन व शुभेच्छा !

आपला,
कृ.ज. दिवेकर

****

प्रिय डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, यांस सप्रेम शुभाशिर्वाद

अगदी प्रथमच पत्र लिहीत असले की तुम्हांला शुभशिर्वाद देण्याइतकी वयानं तरी मी मोठ्ठी आहे. (वय ८५) तेव्हा स्वीकार करावा. सध्या तिळगुळाचे दिवस आहेत तेव्हा ते पण खाऊन तोंड गोड करावे.

'हितगुज'चा ७६वा अंकच एकदम हातांत आला. अन् त्यांत ७५व्या विशेषांकाचे गुणगान वाचून मला पण ते हवाहवासा वाटू लागला. म्हणून मी नीलांबरीला फोन केला. त्याप्रमाणे तिने आपल्या नवऱ्यालाच दूत करून माझ्या घरी मुद्दाम अंक घेऊन पाठविले. आमच्या लहानपणी अेक गाणे होते.. 'हितगुज मनींचे सांगू कुणाला ? तर आता संपादिकेलाच मनांतील गोष्टी सांगून टाकाव्यात. अंक खर तर अजून सर्व वाचून संपायचाय पण अंक आल्यापासून घरांत कुणीतरी जवळचं नातेवाईक आल्यासारखाच आनंद होतो आहे. सर्व मराठे परिवारांतील शेलक्या लोकांच्या मुलाखती वाचून फारच मजा आली. अन् अेक तर प्रिया. तिला पत्र पण लिहून झाले. मुखपृष्ठावरचं रुपडं पाहून अेकदम छान वाटलं. हल्ली मालिकानायिकांचे फोटो द्यायची पद्धतच आहे. पण प्रिया तर चक्क मराठे परिवारांतीलच निघाली त्याचा फार आनंद झाला.

खरं तर आत्ता माझ्या समोर मराठे कुलवृत्तांत नाही. त्यामुळे त्यातला संदर्भ नंबर मला सांगता येणार नाही. पण त्यामुळे काही अडू नये असे वाटते. आम्ही आपली साधी माणसे, कष्ट करून खाऊन पिऊन कुणाच्या अध्यांत मध्यांत नसलेली. विशेष उल्लेखनीय कार्य केलेले नाही. पण पुढच्या पिढींत भावाच्या विक्रम आणि विवेक या नातवंडांनी गिरीभ्रमण, हिमालय यात्रा अशा पराक्रमाच्या गोष्टी 'मराठे' नावाला साजेशा केल्या. शाळेत कविता शिकवितांना इतिहासाच्या तासाला मराठ्यांचा इतिहास, मराठे असा अुल्लेख आला की मुली माझ्याकडे वळून बघत आणि मला अभिमान वाटत असे. मी मराठे असल्याचा. 'वेडांत मराठे वीर दौडले सात'' ही कविता आम्ही जोरजोरांत म्हणत असू.

मुक्ता श्रीखंडे
राहुल अपार्टमेंटस् २८, तुळशीबागवाले
कॉलनी, सहकार नगर - २,पुणे - ४११००९

****

स.न.वि.वि. नववर्ष शुभेच्छा सर्व बंधुभगिनी मातृपितृ वर्गास ! 'हितगुज' वाचून सुचले ते कळवीत आहे.

'हितगुज' विशेषांक ७५ नंतर ७६ (२ प्रति)चे वाचन विशेष खूप लिहावे, करावे, गावे, बोलावे, हसावे याचेच स्पंदन !

गोव्यानंतर विविध U.U.U. छान सुखद अनुभव अुधळणे !

आम्ही म्हातारे खरेच पण सुंदर भुलवण !

सहस्त्र अभिवादन कै. विष्णु नारायण !

कार्पोरेट शरदराव श्रद्धांजली नामी आठवण !

*(पृष्ठ २२ वर)*

## मानसन्मान



श्रीमती प्रमिला वसंत मराठे यांचा ‘माता जानकी’ पुरस्काराने गौरव

श्रीमती प्रमिला वसंत मराठे यांना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुणे शाखा यांच्या वतीने ५ नोव्हेंबर २००८ला रंगभूमीदिनी ‘माता जानकी’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठे प्रतिष्ठानतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

प्रमिला ताईंची नाट्यक्षेत्रातील कामगिरी थोडक्यात देत आहोत.

नाट्यक्षेत्रातील माहिती : भरत नाट्य मंदिर या संस्थेच्या ‘दिल्या घरी तु सुखी रहा’ ‘दिवा जळू दे सारी रात’ ‘माझा कुणा म्हणू मी’ ‘मृच्छकटीक’, ‘सौभद्र’, ‘मानापमान’ ‘संशयकल्लोळ’ आणि ‘स्वयंवर’ या नाटकांच्या अनेक प्रयोगातून कामे केली.

- ॲक्टीव्ह थिएटर्सच्या ‘अशी पाखरे येती’ या नाटकाच्या अनेक प्रयोगातून काम केले.

- श्री. जयराम शिलेदार यांच्या मराठी रंगभूमी या संस्थेच्या संगीत नाटकातून कामे केली त्याचप्रमाणे ‘तुझे आहे तुजपाशी’ या नाटकाचे किमान २०० प्रयोगातून कामे केली.

श्रीकांत मोघे, विवेक, मधु आपटे, माई भिडे, रामदास कामत, रमेश देव, सीमा, अविनाश खर्शीकर, सुमती टिकेकर, शरद तळवलकर, दाजी भाटवडेकर, सुहासिनी देशपांडे, भारती गोसावी, राजा गोसावी, शिलेदार कुटुंबिय, अविनाश देशमुख, स्मिता ओक, संगीत भूषण रामभाऊ मराठे, छोटा गंधर्व, या प्रतितयश कलाकारांबरोबर कामे केली.

प्रमिलाताईंचा महत्त्वाचा गुण किंवा आवड म्हणजे संगीत भूषण राम मराठे यांचे ज्यावेळी पुण्याला नाटकाचे किंवा गाण्याचे कार्यक्रम असायचे त्यावेळी कार्यक्रम संपल्यावर सर्व कलाकारांना ‘पिठल भात’ खाऊ घालणे. खरोखर त्यांच्या ‘हातचे पिठल भात’, प्रसाद सावकार, ज्योत्सना मोहीले, विश्वनाथ बागुल, भार्गवराम मामा आचरेकर इ. कलाकारांनी त्याचा आस्वाद घेतला आहे. प्रसिद्ध लेखिका योगीनीबाई जोगळेकर आणि प्रसिद्ध हार्मोनियम वादक गोविंदराव पटवर्धन यांनी त्यांच्यावर बहिणीवत प्रेम केले आहे अशा या रंगभूमीवर काम करून दुय्यम भूमिका साकारणाऱ्या तर कधी रंगभूमी पाठीमागे काम करून अविरत रंगभूमीची सेवा केली.

विशेष म्हणजे हा पुरस्कार मिळण्यासाठी कोणतेही अर्ज, ओळख न देता नाट्यपरीषदेने प्रमिलाताईंच्या सेवेची दखल घेतली.

❑❑❑

*(पृष्ठ २१ वरून)*

### वाचकांचा पत्रव्यवहार

अुत्तम सद्विचार कथा सत्यनारायण !
परस्पर संवाद (हवे फोन नं.) वाजतील असंख्य फोन !
घडो धडाक्यात नवे भव्य कीडायोग, काव्यवर्ष संमेलन २००९ !
मानसन्मान सर्व काही सांभाळून
जय श्रीराम, व्याडेश्वर, अंबाजोगाई !
आपला शरश्चंद्र केशवराव मराठे
भ्रमणध्वनी-९४२१८८३८५८
आजीव १०८६ - सत्यम्, विद्यानगर, भंडारा, पिन-४४१९०४
फोन- २५३१३०

*****

मी ‘हितगुज’चा नियमित वाचक असून त्यातील लेख बोधप्रद व वाचनीय असतात.

- श्री. चंद्रशेखर चिंतामण मराठे
(पृ.२४८)
२०२, सुशिल गार्डन-३, ५२ बंगला,
पनवेल, (जि. रायगड) पिन-४१०२०६
दूरध्वनी-६५१९०६०१

## सौ. मंजिरी मराठे (पृ.३९२) यांचा ‘राजस स्वरचांदणे’ हा सांगीतीक कार्यक्रम

रविवार दि.१५ फेब्रुवारी २००९ ला सकाळी १० वा. शिवाजी मंदिर, दादर येथे कै. राजा बढे आंच्या गीतांचा-कवितांचा सुरेल प्रवास, ‘राजस स्वरचांदणे’ या कार्यक्रमाद्वारे सौ.मंजिरी मराठे यांनी उत्कृष्टरित्या सादर केला.

‘माझिया माहेरा जा’, ‘चांदणे शिंपीत जाशी’, ‘हसले मनी चांदणे’, ‘कळीदार कपूरी पान’, ‘जय जय महाराष्ट्र माझा’ अशी अनेक सरस गाणी वर्षा भावे, नंदेश अुमप, मेघना सहस्त्रबुद्धे, चैतन्य कुलकर्णी यागायक कलाकारांनी अप्रतिम गाऊन कार्यक्रमाला बहार आणली. अेवढ्या थोड्या वेळात कविवर्य राजा बढे यांच्या कवितांविषयी आणि व्यक्तित्वाविषयी पुरेपूर माहिती देणे हे तसे कठीण काम पण सौ.मंजिरी मराठे यांनी ते यशस्वीरित्या पार पाडले. त्यामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली. सौ.मंजिरी तशी भाग्यवान. सासरच्या मराठे कुटुंबियांना मंजिरीच्या गुणांचे कौतुक आहे आणि तिला ते सतत प्रोत्साहन देऊन सहकार्य करीत असतात. तिच्या वयाने ज्येष्ठ सासूबाई, श्रीमती लीला अनंत, दीर श्री.शिरीष व सौ.अश्विनी, यजमान श्रीनिवास इ. मराठे कुटुंबिय या कार्यक्रमासाठी आवर्जून अुपस्थित होते. विख्यात लेखिका प्रा. विजया राज्याध्यक्ष आणि बढे कुटुंबिय यांनाही हा कार्यक्रम आवडला. त्यांनीही मंजिरी मराठे यांचे जाहीर कौतुक केले.

*हिरकणी पुरस्कार विजेती*

## शवविच्छेदन क्षेत्रातील पहिली भारतीय स्त्री

# डॉ.वसुधा आपटे (पृ.६२३) माहेरच्या विद्वांस

(उपाध्यक्ष श्री.रमाकांत विद्वांस यांच्या त्या भगिनी आहेत)



वैद्यक हा व्यवसाय नाही, तर समाजसेवी पेशा मानून कार्य करणाऱ्या वैद्यकांची मोठी परंपरा महाराष्ट्रात आहे. डॉ.वसुधा आपटे याही याच मुशीत घडलेल्या. त्यांनी या पेशाला सामाजिक न्यायाचा आणखी एक नवा आयाम जोडला आणि वैद्य क्षेत्रातील एका छोट्या पायवाटेवर स्वत:च्या दमदार पाऊलखुणा उमटवल्या. न्यायवैद्यकशास्त्र या शाखेत त्यांनी ३८ वर्षांपूर्वी पदार्पण केले, तेव्हा त्या विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम देखील मुंबईत उपलब्ध नव्हता. त्या विषयाची अनभिज्ञता इतकी की, त्यांना चक्क शवविच्छेदक म्हणून उल्लेखले जाई. वास्तविक शवचिकित्सा हा त्यांच्या कामाचा केवळ एक भाग होता. जिवंत व्यक्तींच्या जखमांची चिकित्सा करणे, वैद्यक आणि न्याय अशा दुहेरी कात्रीत सापडलेल्यांना योग्य मार्ग दाखवणे असे त्यांच्या कामाचे अनेक पैलू आहेत. डॉ. वसुधा आपटे मुंबईच्या नायर रुग्णालयातून ३२ वर्षांच्या सेवेनंतर न्यायवैद्यकशास्त्र प्रमुख आणि प्राध्यापिका या पदावरून निवृत्त झाल्या. त्यानंतर सुरतच्या पालिका वैद्यकीय महाविद्यालयामध्ये न्यायवैद्यकशास्त्र विभागाची घडी बसवण्यात आणि तेथे त्या विषयाचा पदव्युत्तर पदवी विभाग सुरु करण्यात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. त्या स्वत: नायर रुग्णालयाच्या टी.एन.मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनी. त्यांनी पॅथॉलॉजी विषयात एम.डी.ची पदवी घेतली आणि मग कायद्याची. एम.बी.बी.एस.ला असताना त्यांना न्यायवैद्यक हा एक विषय अभ्यासाला होता. त्या विषयाने डॉ.वसुधा आपटे यांना विशेष भुरळ घातली. त्याचे कारण दडले होते त्यांच्या वारसात. वैद्यक आणि न्याय या दोन्ही विषयांचा अत्युच्च वारसा त्यांना लाभला आहे. न्या. महादेव गोविंद रानडे हे त्यांचे पणजोबा. वडिलांचे आजोबा. त्या पूर्वाश्रमीच्या विद्वांस. त्यांचे वडीलही न्यायक्षेत्रातील अध्यापक होते. मुंबईच्या न्यू लॉ कॉलेजचे उपप्राचार्यपद त्यांनी भुषविले होते आणि वैद्यकाचा वारसा त्यांच्याकडे आला आजोळहून. डॉ.वसुधा आपटे यांचे आजोबा डॉ.कुर्लेकर हे स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय सैन्यदलात वैद्यक सेवेत होते. त्यामुळे वैद्यक आणि न्याय हे दोन्ही विषय डॉ.वसुधा यांना खुणावत. त्यांच्या शिक्षणकाळात 'न्यायवैद्यक' विषयात पदव्युत्तर अभ्यास करण्याची सोय नव्हती. म्हणून दोन्ही पदव्या स्वतंत्रपणे घेऊन त्या नायर रुग्णालयातील या विभागात रुजू झाल्या. कालांतराने नायर रुग्णालयात न्यायवैद्यकशास्त्रात एम.डी. करण्याची सोय झाली, तेव्हा डॉ.आपटे या त्या विषयाच्या आद्य परीक्षक ठरल्या. 'उपअपमृत्यू निर्णेता' नावाचे एक महत्त्वाचे पद असते. या निर्णायक जबाबदारीच्या पदावर काम करणाऱ्या त्या इतिहासातील पहिल्या महिला ठरल्या. आत्महत्या, घातपात, खून, बलात्कार, हुंडाबळी, मारामारीच्या घटनेतील गुन्हेगार व शोषित अशा अनेक संदिग्ध केसेसच्या वेळी योग्य परीक्षणाअंती निर्णय देणाऱ्या पदावर काम करणे, हे विशेष आव्हान त्यांनी हिमतीने पेलले. आज त्या निवृत्तीनंतरही कार्यरत आहेत. न्यायवैद्यक सल्लागाराच्या भूमिकेतून त्या अनेकांना दिलासा देण्याचे मोलाचे काम अथकपणे करत आहेत. न्या. रानडे यांच्याकडून त्यांना लेखनाचा वारसाही मिळाला आहे. मध्यंतरी त्यांनी 'प्रत्यक्ष' या डॉ.अनिरुद्ध जोशी यांच्या दैनिकात न्यायवैद्यकविषयक १३९ लेखांची मालिका लिहिली. अलिकडेच मुंबई आकाशवाणीवरही त्यांची व्याख्यानमाला प्रसारित झाली होती. डॉ.वसुधा आपटे यांना सह्याद्री वाहिनीचा हिरकणी पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे अनवट वाटेवरच्या या पांथस्थाचा उचित सन्मान होत आहे. मानवाची सेवा जिवंतपणी आणि मृत्युनंतरही करणाऱ्या या क्षेत्राची आणि त्या क्षेत्रात पथदर्शक काम करणाऱ्या या महिलेची कर्तृत्वगाथा अनेकांना प्रेरक ठरू शकेल.

मराठे प्रतिष्ठान तर्फे डॉ.वसुधा आपटे यांना मानवंदना.

डॉ.वसुधा आपटे, एल.३/७०१ प्लॅट न.१, पूनम-प्रगती, पटेल रोड, पूनम नगर, अंधेरी, मुंबई. दूरध्वनी २४७९१०३५

❑❑❑

**खापरपणजी सौ. गौरी शिवराम मराठे**

यांच्या स्मरणार्थ

**CA प्रभाकर दामोदर मराठे**

वडाळा, मुंबई ४०००३१

सेल:९८२० २३२०८२ दूरध्वनी : २४१५ ०८८९

ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

महाराष्ट्रीय लोकांमध्ये आणि विशेषत:
समस्त मराठे कुटुंबियांमध्ये बांधकाम क्षेत्रामधील
एकमेव विश्वसनीय नाव

# निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्

## संचालक - श्री. अजित श्रीराम मराठे



**नेरळ स्टेशनपासून फक्त १ कि.मी. अंतरावर,**

## उल्हास नदीकिनारी वसलेली बंगलो स्कीम

आमचे अन्य प्रोजेक्टस्

- निर्माण माथेरान व्हॅली नेरळ - बंगलो स्कीम
- निर्माण नगरी नेरळ - मिनी टाऊनशिप
- ऋतुनिर्माण नेरळ - बंगलो स्कीम
- खंडाळा - निर्माण हायलॅन्ड बंगलो स्कीम
- मधुसुमित्रा निर्माण - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम
- निर्माण लेक व्ह्यू - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम

आमचे मुंबईतील प्रोजेक्टस्

- महालक्ष्मी,
- जोगेश्वरी,
- गोरेगाव,
- मालाड,
- कांदिवली,
- विलेपार्ले (पूर्व) आणि विलेपार्ले (पश्चिम) स्टेशन समोर

हेड ऑफिस :१४, न्यायसागर अपार्टमेंट, नागरदास रोड, चिनॉय कॉलेज समोर, अंधेरी (पूर्व), मुंबई-६९
संपर्क : २६८३ ३१३१ () साईट ऑफिस : नेरळ (सेंट्रल रेल्वे मुंबई-कर्जत मेन लाईन),
दूरध्वनी : ०२१४८-२३८२५१ / ०२१४८-२३६६९६

BOOK POST

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

त्रैमासिक हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक : डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ● ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल (१)**sitaram_khambete@yahoo.com** (२)**maratheparivar@yahoo.co.in** वेबसाईट: **www.marathepratishthan.org**